नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुररस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

संकल्पित रंगमंदिर

कै. भाऊजी दफ्तरी स्मृती
संदर्भ ग्रंथालय
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

वर्ष ११ — संपादक : — डिसेंबर १९५६
अंक ९ — पां. कृ. सावळापूरकर — किंमत आठ आणे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

संपादकीय ....

विद्वानांच्या परिसरांत तरुणांची कैफियत ....

आधुनिक मराठी काविश्रेष्ट : कै. भा. रा. तांबे ....

खाडीलकारांची संगीत नाटके..................

पुस्तकपरीक्षण ‘चंद्रपूरचा इतिहास’ ....

पत्रव्यवहार ....

विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक समिती ....

अभिप्राय ....

संघवार्ता ....

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संमेलनाचें १९ वें अधिवेशन

विदर्भ साहित्य संघाचें ह्या वर्षीचें संमेलन आमगाव ऐवजीं गोंदिया येथे डिसेंबरच्या ३०, ३१ व १ जानेवारी ह्या तारखांना भरणार असून त्यासंबंधी पूर्वतयारी चालू आहे.

विदर्भ साहित्य संघाच्या घटना क्रमांक १८ (इ) प्रमाणे संमेलनापुढे मांडावयाच्या ठरावांची सूचना सभासदांनी संमेलन भरावयाच्या तारखेपूर्वी १४ दिवस अगोदर सरचिटणिसांकडे पाठविली पाहिजे.

श्री. गो. काशीकर,
सरचिटणीस

विदर्भ साहित्य संघाचे डिसेंबर १९५६ मधील कार्यक्रम

प्रा. ना. सि. फडके यांचीं व्याख्यानें

शनिवार दि. १-१२-५६ सायं. ६ वाजतां
"ललित साहित्याची प्रतिज्ञा आणि कसोटी"

रविवार दि. २-१२-५६ सायं. ६ वाजतां
"ललित साहित्याची शक्ति आणि मर्यादा"

सोमवार दि. ३-१२-५६ सायं. ६ वाजतां
"कादंबरीचें स्वरूप आणि तंत्र"

स्थळ : हिंदी साहित्य संमेलन-मोर भवनाचें प्रांगण

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वि. सा. संघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक :

पां. कृ. सावळापूरकर

संपादक मंडळ :

कृ. व्यं. पेशकार

मा. ल. व्यवहारे

व. कृ. वऱ्हाडपांडे

प्र. दे. कोलते

रा. ना. घाटोळे

भा. श्री. परांजपे

तु. ना. काटकर

वर्ष ११ वें : अंक ९ वा

डिसेंबर १९५६

संपादकीय

कृतज्ञता

'युगवाणी'च्या दीपावलि विशेषांकाचें अनेक मित्रांनी पत्रें पाठवून आणि अनेक वर्तमानपत्रांनी अभिप्राय देऊन जें स्वागत केलें व आमचा उत्साह वाढविला त्याबद्दल आम्ही आपली कृतज्ञता व्यक्त करतों. त्या अंकावरील औचित्यपूर्ण मुखपृष्ठासंबंधी 'सुश्लोकमानस'कार डॉ. श्रीखंडे यांचा वृत्तबद्ध अभिप्राय व त्यावर श्री. चिं. द्वा. देशमुख यांचें वृत्तबद्ध उत्तर हीं दोन्ही चालू अंकांत प्रसिद्ध करीत आहोंत.

ललित साहित्य विशेषांक

'युगवाणी'च्या या आगामी संकल्पित ललित साहित्य विशेषांकाची रूपरेषा गेल्या अंकांत दिलीच होती. त्याप्रमाणे तो अंक मार्च १९५७ मध्ये प्रसिद्ध होईल. त्यासाठी प्रसिद्धयर्थ पाठवावयाचें साहित्य जानेवारी अखेरपर्यंत तरी 'युगवाणी'कडे आलेंच पाहिजे, याकडे आम्ही लेखकांचें लक्ष वेधूं इच्छितों. मागे विनंती केल्याप्रमाणे तें साहित्य केन्द्रीय कार्यालयाकडे न पाठवितां प्रा. मा. ल. व्यवहारे, खापर्डे बगीचा, अमरावती यांजकडे परस्पर पाठवावें.

संमेलन

विदर्भ साहित्य संघाचें वार्षिक साहित्य संमेलन यंदा डिसेंबर अखेरीला गोंदिया येथे भरण्याचें निश्चित झालें आहे. सांस्कृतिक समितीची व्याख्यानमाला आणि वि. सा. संघ सहकारी नाट्योत्सव समितीचा नाट्योत्सव ह्या भरगच्च कार्य-क्रमानंतर लगेच हें संमेलन होणार असल्यामुळे हा संपूर्ण महिना संघाच्या दृष्टीने मोठा गडबडीचा जाणार आहे. १९१८ मध्ये गोंदिया येथेच संमेलनाचें अधिवेशन भरलें होतें. आठ वर्षांनंतर त्याच जागीं भरणारें अधिवेशन पूर्वीइतकेंच यशस्वी होईल यांत शंका नाही.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

विद्वानांच्या परिसरांत तरुणांची कैफियत

ब. स. येरकुंठवार

यमराजाचा दरबार

" एकदा असें झालें म्हणतात. पुष्कळ दिवसांच्या रजेनंतर यमराजाचा दरबार भरला होता. आणि तत्पूर्वी त्यावाबत असाहि गाजावाजा झाला होता की, तो अतिशय महत्त्वाचा व वैशिष्टयाचा व्हावयाचा आहे. मृत्युलोकांतून, कांही असे गुन्हेगार आले होते की, ज्यांच्या पापपुण्याच्या निवाडयाबाबत मोठी समस्या यमलोकांत उत्पन्न झाली होती. सर्व अधिकारी-मंडळ व सदस्यमंडळ आपआपल्या आसनावर स्थिर झाल्यावर व यमराजांची स्वारीहि आगत–स्वागतपूर्वक स्थानापन्न झाल्यावर दरबारचें कामकाज सुरु झालें. एकेकाच्या नांवाने पुकार होऊन खटल्याची पेशी होऊं लागली. किरकोळ कामकाज झाल्यावर दोन प्रमुख खटल्यांना यमराजाने हात घातला. दोन पैकी एक मृत्युलोकांतल्या प्रसिद्ध खुनी इसमाबाबत होता व दुसरा एका प्रसिद्ध लेखकाचा होता. यमलोकांत जास्त कुतूहल उत्पन्न झालें होतें या दुसऱ्या गुन्हेगाऱ्याच्या खटल्याबद्दल ! खुनी इसमाचा सर्व पुरावा यमराजासमोर आल्यावर त्यांनी त्याला अत्यंत मामुली शिक्षा दिली. ही सुनावणी ऐकून दरबारी मंडळी बुचकळयांत पडली. पण त्याहिपेक्षा पुढच्या खटल्याच्या सुनावणीने ती अधिक बुचकळयांत पडली. लेखक-महाशयासंबंधी चित्रगुप्ताने जो पुरावा ठेवला, त्यावरून त्याला अखंड नरकवासाची शिक्षा ठोठावण्यांत आली. आणि तीमुळेच सारा दरबार अस्वस्थ झाला. आपआपसांत लोक कुजबुजूं लागले. दरबाराची ही असंतुष्ट अवस्था पाहून यमराजांनी असा प्रश्न केला की, 'आज सर्व मंडळी अस्वस्थ व असंतुष्ट दिसतात, तेव्हा काय भानगड आहे ? कोणाला कांही बोलावयाचें असल्यास त्याने आपली कैफियत स्पष्ट मांडावी. तिचा विचार केला जाईल.' हा दिलासा दिल्यामुळे, थोडें भीत भीत कां असेना, एकाने बोलण्याचें धाष्टर्य केलेंच. तो म्हणाला, ' महाराज, आपण अत्यंत समदृष्टि व फार न्यायनिष्ठुर आहांत. आजपर्यंत आपल्या न्यायदानाबद्दल आम्हाला कधीच विकल्प वाटला नाही. पण आजचा प्रसंग वेगळाच दिसतो. एका निर्घृण खुनी इसमाला आपण अगदी मामुली शिक्षा केलीत व एका प्रसिद्ध लेखकाला, की ज्याने मृत्युलोकांत खूप ग्रंथ-संपत्ति निर्माण करून लोकसेवा केली आहे, त्याला अखण्ड नरकवासाची कठोर व अन्याय्य शिक्षा ठोठावलीत, हा आम्हांला आपल्या न्यायबुद्धीस कलंक वाटतो.' हें म्हणणें ऐकल्यावर अत्यंत निःपक्षपाती व न्यायनिष्ठुर असलेल्या यमराजांची कनवाळ दृष्टि क्रूर झाली, चेहरा उग्र झाला व ती मूर्ति उद्गारली की, ' खुनी इसमाने फार झालें तर पाच दहा लोकांचे गळे घोटून मृत्युलोकाचें नुकसान केलें असेल, पण या लेखक-महाशयाने एक-दोन पिढयाच्या पिढयाच प्रज्ञाहत करून गारद केल्या आहेत. त्याला तीच शिक्षा समुचित आहे.' यमदरबार योग्य न्याय लागल्याच्या समाधानांत बरखास्त झाला.

आम्हा तरुणांची मूक भीति

यमराज, यमदरबार, पाप–पुण्यांचा निवाडा इ. गोष्टी खऱ्या आहेत किंवा नाहीत हें आम्हांस ठाऊक नाही. पण खरोखरच त्या अस्तित्वांत असतील तर, आम्हा तरुण मंडळींचें हृदय एका मूक भीतीने कंपित होतें. ज्या ज्या थोर लेखकांनी आम्हाला पूर्वी वेगळेंच वळण लावून दिलें आहे व ज्यांचे संस्कार आता आमच्या हृदयावर कायमचा ठसा उमटवून

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बसले आहेत आणि आता मात्र ज्यांचीं मतें परिवर्तन पावलीं आहेत ते यमराजासमोर कोणत्या अवस्थेंत उभे रहातील ? आम्ही तरुण मंडळी त्यांच्या सल्ल्याने व शिकवणीने बहकलोंच आहोंत व आता आमचा तरणोपायहि नाही. तारुण्य-सुलभ श्रद्धा, उत्साह भक्ति इ. वृत्तींनी आम्ही त्यांच्या नादीं त्या वेळीं लागलों व त्यांनी जें जें बाळकडू आम्हांस पाजलें तें तें मोठ्या आनंदाने आम्ही प्यालोंहि. अज्ञानाचें फळ आम्हांस मिळालें ! परंतु अज्ञानकृत दोषांना एवढी कठोर शिक्षा नसते म्हणतात. पण जे जाणते होते व जे आज बदलले त्यांची गति काय ? या प्रश्नाने आमचें मन सुन्न होऊन जातें. नेपोलियनने एकदा असें म्हटलें होतें म्हणतात की, 'मी तरवारबहाद्दरापेक्षा लेखणीबहाद्दराला जास्त भितो. कारण साऱ्या राष्ट्रावर त्याचा प्रभाव पडतो व तो राज्येंहि उलथवून लावू शकतो.' हें त्याचें म्हणणें आम्हां तरुण मंडळींच्या अनुभवास पुरतेपणीं आलें आहे.

श्री. पु. य. देशपांडे

आता हेंच पहा. आमच्या प्रांतांतील प्रथितयश विद्वान् साहित्यिक श्री. पु. य. देशपांडे यांच्या परिवर्तनाने आमची किती केविलवाणी स्थिति झाली आहे ! पूर्वी त्यांनी आपल्या कादंबऱ्या, कथा, लेख व भाषणें इत्यादींतून कोणत्या विचार-सरणीचा प्रचार केला हें सर्वविश्रुत आहेच. पण आजची त्यांची 'अनामिकाची चिंतनिका', योग-उपनिषदांवरील व्याख्यानें व त्यांचा E S P (Extra Sensory Perception म्हणजे अतीन्द्रिय ज्ञान—ज्याबद्दल Rhine या जगप्रसिद्ध अमेरिकन शास्त्रज्ञाचे प्रयोग व निर्णय फार विख्यात आहेत) वरील विश्वास व रुचि या गोष्टी पाहिल्या म्हणजे आम्ही मोठे गडबडून जातों. निराशेच्या पोटीं आम्हांस विकट हास्य करावेसें वाटतें. मतपरिववर्तन झालेल्या थोरांच्या प्रांजळपणाबद्दल, त्यांच्या विकासी वुद्धिमत्तेबद्दल, सरळ कबूली देण्याच्या त्यांच्या धाडसाबद्दल आम्हांला नेहमींच सकौतुक आदर वाटत राहील. परंतु त्यांच्यापासून आम्ही जें शिकलों व जीं धुळाक्षरें आम्ही घोटलीं तीं आमच्या नशिबीं कायमचीं राहिलींत व ते स्वतः मात्र त्या 'बंधनाच्या पलीकडे' निसटले. आम्ही तरुण मंडळी सामान्यच. आमच्यांत त्यांच्याइतकी झेंपाळू बुद्धिमत्ता असणें असंभवनीय. ते स्वतः बदलले असूनहि आम्हांला अजूनहि त्यांची पूर्वींचीच विचारसरणी मेंदूंत कोंबून घ्यावी लागते. एम. ए. च्या मराठी परीक्षेकरिता अभ्यासावा लागणारा त्यांचा लेखसंग्रह या गोष्टीचीच साक्ष आहे. स्वतः त्यांनी त्यावावत कांहींहि पाऊल टाकल्याचें आमच्या माहितींत नाही. वस्तुतः त्यांनीच आपणहून हा लेखसंग्रह परावृत्त करून घ्यावयास हवा होता. म्हणजे अशी स्थिति आहे की, स्वतः ते आज जसे आहेत तसे आमच्यासमोर उभे नाहीतच. यामुळे आमचें किती अपरिमित नुकसान झालें असेल तें काय सांगावें ? मोठमोठ्या लेखकांच्या मतपरिवर्तनांत त्यांच्या आयुष्याचें सोनेंहि होत असेल. व्यक्तिशः त्यांची उन्नति घडतहि असेल. पण आम्हा तरुणांच्या नशिबीं ? ज्यांच्या पावलांवर पाऊल टाकून जावें त्यांचींच पावलें पुढें न दिसलीं तर !

श्री. वि. स. खांडेकर

स्वभावतःच गतानुगतिक असलेल्या आम्हा तरुणांना नांवाजलेल्या किती लेखकांनी लटकतें ठेवलें आहे, अनिश्चितताच्या काळोखी गर्तेत ढकललें आहे म्हणून सांगावें ? आमच्या श्री. भाऊसाहेब खांडेकरांचेंच पाहाना ! त्यांची 'सांजवात', 'तिसरा प्रहर', 'केसरींतील परीक्षण' (१७ जून १९५६) इ. वाचणाऱ्या आम्हा मंडळींना आज काय वाटत असेल ? त्यांचें पूर्वीचें लिखाण, त्यांतील प्रतिपादिलेली मतप्रणालि हे कुठे व आजचा त्यांचा पालट कुठे ? आम्ही आमचें आयुष्य कोणत्या मुशींत ओतून घडवावें ? त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल व सत्यनिष्ठेबद्दल आमच्या मनांत स्वप्नांतहि किंतु उत्पन्न होत नाही. परंतु आम्ही ज्या आपत्तींत कोंडलों गेलों आहोंत त्यांतून बाहेर पडण्याचा मार्ग कोणता ? एखादी व्यक्ति आपल्या आयुष्यांत हवें तितक्यांदा पालटू शकते. पालटाने तो परिपक्व होत जाते असेंहि प्रतिष्ठितपणें म्हणतां येईल. पण एका व्यक्तीची गोष्ट

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वेगळी वाणि समाज व त्याच्या पिढचा यांची गोष्ट वेगळी. व्यक्तीप्रमाणे ते हरघडी पालटूं शकत नाहीत आणि याच गोष्टींत आमचें सारें दुःख व सारी आपत्ति रुजलेली आहे. त्यांच्या पूर्ववाङ्मयाने तयार झालेलीं आमचीं मनें त्यांच्या इतकीं लवकर पालटूं शकत नाहीत. मग आमच्या अंतःकरणाचा हा आक्रोश कोण ऐकणार ? हें 'अरण्य–रुदितं'च ठरावें अशा या आमच्या प्रारब्धाचे विधाते कोण ? आमचा पाठपुरावा करावयास आमचे गुरुजन आज आमच्या पाठीशीं नाहीत, त्यांनी वेगळयाच दिशेने कूच केलें आहे व आम्हांस असहाय स्थितींत टाकून दिलें आहे. हा दारुण शोक करण्याचेंच आमच्या नशिबीं अखेर आलें ना ? श्री. खांडेकरांनी सध्या आम्हांस असें शिकविलें आहे की, पूर्वीचीं जीवनमूल्यें टाकाऊ ठरलीं आहेत आणि नवीं जीवनमूल्यें अजून उत्पन्न झालीं नाहींत. तीं कोणतीं असावींत याबद्दल ते स्वतःच चांचपडत आहेत. त्यामुळे तर आम्हा तरुण मंडळींच्या त्रेधेस पारावारच उरत नाही. केशवसुतांनी म्हटल्याप्रमाणे 'जुनें जाउं द्या मरणालागुनि' असें आम्ही आजवर भरपूर पढविलों गेलों. पण 'नवें येउं द्या भरणालागुनि' याचा आम्हांस आज पत्ताहि लागत नाही. श्री. खांडेकरांसारखे विद्वान् लोक आता आपल्या आयुष्याची सांज अनुभवीत असल्यामुळे त्यांनी 'सांजवाते'च्या प्रकाशांत उरल्या आयुष्याची वाटचाल करावी हें ठीकच आहे. पण आम्हा तरुणांचें ? त्यांच्या पूर्वीच्या वाङ्मयवातींनी आमच्या जीवनाचा जो भडाग्नि चेतविला त्याचें काय ? तो खाक करील कोणास ? आम्हां दीनांचा वाली व सोयरा कोण ? त्यांच्याच छुलवणीवरून आम्ही पुरातन मूल्यांचें मूर्तिभंजन केलें व नवीन मूल्यांच्या प्राणप्रतिष्ठेबाबत मात्र ते स्वतःच गटंगळचा खात आहेत. मतमतांतराच्या गलबल्याच्या अंतराळांत लटकत राहणाऱ्या आम्हा तरुणांची स्थिति कै. टागोरांच्या 'अविदितवेदना देवी ऊर्मिले' सारखीच झाली आहे. हाय ! हाय !!

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

बरें, यांच्यासारख्यांवर श्रद्धा व विश्वास ठेऊन त्यांच्या मागोमाग जावें तरीहि मोठी आपत्ति. कशी ती पहा. आमचे धर्मकोशकार तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यासारख्या प्रगाढ पंडिताच्या मागे धावतां धावतां आम्हाला धापा टाकाव्या लागतात व अखेरीस ग्लानीहि येऊं पहाते, इतकीं त्यांचीं परिवर्तनें वेगवत्तर व चमत्कारिक आहेत. धर्मशास्त्रांत परिवर्तनवाद व ऐतिहासिक मीमांसा आणणाऱ्या या महाराष्ट्रीय मुखंडाचीं परिवर्तनें आम्हांला घेरी आणतात. धर्म, ईश्वर परलोक, पुनर्जन्म, कर्मवाद इ० गोष्टींबद्दल आम्हा तरुणांच्या श्रद्धा उडविण्याचें प्रबल कार्य ज्या शास्त्रीबोवांनी केलें तेच आता कोणतें वळण घेत आहेत हें पाहिलें म्हणजे कोणत्याच विद्वानावर विश्वास ठेवूं नये असें आम्हा तरुणांना वाटूं लागतें. शास्त्रीबोवांचा वाङ्मयीन प्रवास पाहिला म्हणजे तर आमची गाळण उडाल्याशिवाय राहत नाही. कोकजेशास्त्र्यांच्या 'धर्मस्वरूपनिर्णयाचें परिशिष्ट', 'हिंदुधर्मसमीक्षा', 'अलका–दीपावलि विशेषांकां'तील इतिहासावरचा लेख, 'वैदिक संस्कृतीचा विकास' इ० तील त्यांच्या मताप्रमाणे बदलतां बदलतां आमच्या नाकीं नऊ येतात. पाश्चात्यांच्या इतिहासाच्या कल्पना भारतवर्षास लावूं नयेत असें आतां प्रतिपादन करणाऱ्या या महान् पंडिताने, त्याच कल्पनांच्या आहारीं जाऊन, पूर्वी आम्हांला वैदिक संस्कृतीचा अभ्यास करण्याची परकी दृष्टि दिली होती ना ? आणि आता तर अध्यात्मवादास व परमेश्वराच्या अस्तित्वास संमति देण्यापर्यंत (या गोष्टींच्या भाग्योदयाचे आता दिवस आलेच म्हणावयाचे !) त्यांचें झालेलें परिवर्तन आम्हा मंडळींच्या हृदयांत एक वेगळीच संशययुक्त भीति निर्माण करीत आहे. परिवर्तनें होतां होतां, शास्त्रीबोवा, पूर्वी चूक व रानटी ठरविलेल्या सिद्धांतांनाच तर कवटाळणार नाहीत ना, असें वाटून गेल्याशिवाय राहत नाही. आणि असें वाटल्यावर मनांत अशाहि तरंग उठल्याशिवाय राहत नाही की, मग बिचाऱ्या सनातन्यानीच काय पाप केलें होतें ? त्यांना हास्यास्पद व निंदास्पद ठरविण्याची शास्त्रीबोवा प्रभृतींची चळवळ कितपत परिपक्व व गंभीर होती ? मग भरंवसा धरावा कोणाचा ? विक्राळ सागरी तुफानां-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ऱ्या खळबळींतहि अचल राहणाऱ्या खडकांप्रमाणे असलेल्या सनातन तत्वांचा, की वेळोवेळीं परिवर्तन पावणाऱ्या अर्वाचीन तत्वांचा ? शास्त्रीबोवांसारखे बुद्धिसामर्थ्य असलेले लोक प्रगति करतां करतां सनातन तत्वांच्या उच्चासनावर एक वेळ जाऊन बसतीलहि कदाचित् ! पण एका काळीं त्यांचे श्रद्धापूर्वक अनुयायी बनलेल्या आम्हां तरुण मंडळींची कोणती अवदसा होईल, याचा विचार कोणीच केलेला नाही. हें पाहून, आकाश कोसळल्यासारखेंच आम्हांस होतें. दाद मागावी कोणाजवळ ? कारण विद्वान् लोक देखील अखेरीस स्वार्थच पहातात ! ते स्वतःची उन्नति करून घेतात व त्यांच्या पोशियांच्या वाटयांस त्यांची जुनीं लकतरेंच येतात ! ! काय करावें ? हें पाहून आमचें हृदय फाटून जातें !

श्री. माडखोलकर व प्रा. माटे

सुंभ जळून जातो पण त्याचा पीळ जात नाही असें म्हणतात, तें आम्हा तरुणांच्या मानसिक संस्कारांच्या दृष्टीने नितांत सत्य आहे. आम्ही आतांपर्यंत या श्रद्धेवर वाढविलो गेलों की, खरे शास्त्रज्ञ व ज्ञाते पाश्चात्यच. ते म्हणतील तेंच शास्त्र व तेंच खरें प्रमाण. पण आता आमचे श्री. भाऊसाहेब माडखोलकरांसारखे विशाल बुद्धीचे विद्वान् आम्हांस असें सांगू लागले आहेत की, पाश्चात्य शास्त्रज्ञ बेभरवसेशीर आहेत, त्यांनी गेल्या शंभर दीडशें वर्षांत इतक्या उलट सुलट कोलांटचा खाल्ल्या आहेत की, ते केव्हा पालटतील याचा नियमच नाही. त्यापेक्षा, जें कांही प्रतिपादन करावयाचें असेल तें, आपल्या शास्त्रांच्या बळावरच करावें. श्री. भाऊसाहेब माडखोलकरांच्या चिंतनशील व व्यासंगी बुद्धीची साक्ष आम्हांला सदैव प्रत्ययास येत गेली आहे. परंतु, फ्राईड, हॅवलॉक एलिस प्रभृति शास्त्रज्ञांचें प्रामाण्य व शास्त्रीयत्व त्यांनीच आम्हांस पूर्वी शिकविलें ना ? आणि आमचा तो पीळ कांही केल्या आता जात नाही. त्यामुळे आमची अशी आफत झाली आहे की, आमच्या शास्त्रांवरील श्रद्धा पूर्वीच ढांसळल्यामुळे आता त्यांच्या वाऱ्यासहि आम्हांस उभे राहावेंसें वाटत नाही व ज्या आधार-शिलांवर त्यांनी आम्हांला पूर्वी उभे केलें होतें त्याहि आता ते काढून घेत आहेत. तेव्हा आम्ही उभे राहावें कशाच्या बळावर ? पाश्चात्यांतील परिवर्तनांमुळे हादरून जाऊन मक्कम व पक्का आधार शोधण्याकरिता ही वृद्ध मंडळी, प्रमावीपणाने हजारों वर्षे टिकलेल्या भारतीय शास्त्रांकडे आसऱ्याच्या दृष्टीने वळलीहि असतील. पण आम्हांला त्यांनी दिलेल्या पिळाचें काय ? आम्ही 'इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः' असेंच झालों ना ? श्री. माडखोलकरांनी आपल्या अलिकडील लिखाणांत व प्रा. माटे यांनी आपल्या 'मी व मी पाहिलेलें जग' ('वसंत' मधील लेखमाला) यांत आम्हांला असें दाखवून दिलें आहे की, 'अव्वल इंग्रजींतील मोठमोठे म्हणून गौरविले गेलेले ज्योतिबोवा फुले प्रभृति सुधारक हलक्या प्रतीचेच होते. वैयक्तिक आचरणांत व स्वभावदृष्टचा हीं माणसें थोर असतीलहि. परंतु समाजपुरुष व राष्ट्रपुरुष या दृष्टीने त्यांना फारशी किंमत नाही, ब्रिटिशांच्या व मिशनऱ्यांच्या कुटिल नीतीस बळी पडून व त्यांच्या हातचें बाहुलें बनून त्यांनीच आमच्या समाजांत जातिवैमनस्याची तीव्र कटुता पराकोटीस नेली इ. सत्यें आमच्या वृद्ध विद्वानांनी आमच्या लक्षांत आणून दिलीं, याबद्दल आम्ही त्यांचे शतशः ऋणी आहोंत. 'या त्यांच्या प्रतिपादनाचा फायदा पुढच्या पिढयांना मिळो विचाऱ्यांना' असेंहि आम्हांस मनापासून वाटते. पण आम्ही ? हिंदुस्थानच्या ऱ्हासास जातिभेद कारणीभूत आहे व त्याचें सारें श्रेय ब्राह्मणास आहे अशीच आमची दृढ समजूत आतांपर्यंत मोठमोठयांनी करून दिली व त्याप्रमाणें आम्ही गांधी-हत्येनंतर ब्राह्मणांचें यथाशक्ति शिरकाणहि केलें. तेव्हा या पापाचे वाटेकरी कोण ? आम्ही की आमचे गुरुजन ? या वृद्धांच्या ह्याडांवरोबर परिवर्तनोत्तर त्यांनी केलेलें पुण्यकर्म गाडलें जाईल, पण त्यांचें पूर्वीचें पाप आम्हांसच जाळीत नाही काय ?

डॉ. आंबेडकर व पं. नेहरू

या पापांचे जे चटके आम्हांस लागत आहेत व ज्यामुळे आज आम्ही विव्हळत आहोंत त्यांना, मातीचें तेल टाकून अधिकच दाहक करणारे कोण असतील बरें ? गंगेप्रमाणे पवित्र असलेली, परंतु तिच्याचप्रमाणें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'अधोऽधो' वाहत जाण्याचा गुणधर्म असलेली अगाध बुद्धिमत्ता बाळगणारे आमचे आधुनिक स्मृतिकार... ! त्यांच्या धर्मांतरांच्या प्रथमच्या हुलकावणीने व नंतरच्या प्रत्यक्ष आचरणाने आम्ही मेटाकुटीस आलों आहोंत. आतापर्यंतच्या शिक्षणाने आम्हांस तर असें वाटतें की, माणसाला धर्मच हवा कशाला ? मानवास जशी गीता नको तसेंच बुद्धाचें त्रिपीटकहि नको, अशीच आमची धारणा बनली आहे. गीता जर जाळतां येते तर त्रिपीटकहि कां जाळलें जाऊं नये ? पुन: त्यांनी दिलेल्या धडयांनी आमच्या मनांत असेंहि जंजाळ उत्पन्न झालें आहे की, धर्म ही बाब हवा तसा मोहरा फिरविण्याइतपत सवंग असलेली जर असेल तर तिची प्रतिष्ठाच कशाला बाळगा ? धर्म ही बाब एकतर हास्यास्पद व बांडगुळाचें रूप असलेली असावी अथवा श्रेष्ठ व ध्येयरूप अशी असलीच तर श्री. बाबासाहेब आंबेडकरांकडून तिची द्रौपदी तरी बनविली जात असावी, असें आमच्या तरुण अज्ञ मनास चाटून गेल्याशिवाय रहात नाही. बुद्धधर्माचा उदोउदो करतांना डॉ. आंबेडकर व पं. नेहरू ['हिंदुस्थान गवसल्या'पासून (Discovery of India) त्यांना बुद्धाने फार पिसें लावलें आहे. बुद्ध जयंतीचा भारत-सरकारने जो उत्सव केला त्याची तऱ्हा पाहिली म्हणजे असें वाटतें की, कोणत्याहि धर्माचा अनुयायी काय श्रद्धांध बनेल इतके हे निधर्मी राज्य-सेवक धर्मांध बनले आहेत !] यांना पाहिले म्हणजे अनेक शंका-कुशंका मनांत काहूर माजवितात. संस्कृतांतील एका श्लोकांत असें म्हटल्याचें आमच्या ऐकिवांत आहे की, पत्नीने टाकल्यामुळे व शत्रूकडून अपमान झाल्यामुळे ज्या इसमांत तत्त्वबोधाची इच्छा उत्पन्न होते तो पुरुषांमध्ये अधम होय. (कान्तया विप्रयुक्तस्य शत्रुणावमतस्य च। यस्य तत्त्वबुभुत्सा स्यात् सलोके पुरुषाधम: ॥) या दोन थोर पुरुषाबद्दल असें म्हणतां येत नसलें तरी असें मनांत आल्याशिवाय राहात नाही की, वार्धक्याच्या धक्क्याने तर ते 'बुद्धं सरणं गच्छामि'—शोकांतहि विरंगुळयाकरिता मनुष्य विनोद करितो. ती विनोदबुद्धि आम्हा अज्ञान्यांना या बौद्धघोषाचा अर्थ, 'बुद्ध नांवाच्या सरणाप्रत मी जातो' असाच शिकविते ! —म्हणत नाहीत ? इंग्लिश नास्तिकवादाचा जनक जो ह्यूम त्याला म्हातारपणीं वेड लागलें होतें म्हणतात. मरणाची भीति, मरणोत्तर अस्तित्व नसल्याच्या कल्पनेंतून उत्पन्न होणारी शून्यता व विफलता, म्हातारपणचा एकाकीपणा व भकासपणा इ. नी तो इतका बेचैन झाला की, अखेरीस वेडसर बनला. अशा वेडसरपणापासून भारताच्या धार्मिक पूर्वपरंपरेनें या दोघांहि महापुरुषांना वांचविलें असावें. त्याचेंच प्रत्यंतर म्हणजे त्यांची बुद्धांवता. पण आम्हा तरुणांच्या मनास जी गोष्ट बेचैन करते ती ही की, बुद्धाने परलोक, कर्मवाद, पुनर्जन्म, योग, मंत्र इ० इ० गोष्टी सानुभव प्रमाण म्हणून सांगितल्या होत्या असें इतर विद्वानांच्या लिखाणावरून दिसते, त्या गोष्टी डॉ. आंबेडकर व पं. नेहरू हे मानतात काय ? तसे ते मानत असले तर, या सर्व गोष्टी झूट आहेत असें जें त्यांनी आजवर आमच्या मनावर कोरलें व त्यामुळे आमचें जें नुकसान झालें त्याला जबाबदार कोण ? बुद्धधर्माच्या शिडीने ते स्वर्गास चढत आहेत व आम्ही मात्र सप्तपाताळांत खोल गडत आहोंत ! या द्विविध परिणामाने त्यांचें पुढारीपण खासच सार्थ ठरते ! ! आणि वरील गोष्टी न मानतांच जर बुद्धाचा जयजयकार ते करीत असले व आम्हांसहि करावयास लावीत असले तर त्याचा अर्थ तरी आम्ही काय समजावा ? जो जास्तींत जास्त बनाव करूं शकेल तोच पुढारी असें ठाम तत्त्व आम्ही उमजावें व त्यांच्या नादीं लागून आत्महत्या करून घ्यावी हेंच अखेरीस टाकत आलें ना ? डॉ. आंबेडकरांच्या उड्डानशील बुद्धिमत्तेने तर आता असेंच वाटूं लागलें आहे कीं, निसर्गानें मानवास इतकी अक्कलच दिली कशाला ? अधिक ज्ञानानेच मानव पशु बनतो का ? 'ज्ञानेन युक्ता: पशुभि: समाना:' असेच म्हणण्याची पाळी आज आमच्यावर यावी ना ?

सौ. मालतीबाई बेडेकर

आम्हा तरुणांची कांही मोजक्याच क्षेत्रांत दैना झाली आहे असेंहि म्हणतां येत नाही, असें आता दुर्दैवाने म्हणावें लागत आहे. अथवा दुर्दैव तरी कसचें ? तरुण मनाची ही शाश्वत नियतिच दिसते कीं, कोणीहि

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उठावें व ज्याने त्याने आपआपल्या अकलेप्रमाणे ही माती हवी तशी तुडवून यथारुचि साकार करावी. विद्वानांकडूनच आम्ही बनविलों गेलों असें नाही, अनेक विदुषींनीहि आमच्या कोवळ्या मनावर कशिदा काढून तें कायमचें रंगवून टाकलें आहे. फार कशाला ? सौ. मालतीबाई बेडेकरांचेंच उदाहरण घ्याना. आम्हा तरुण–तरुणींना त्या आता असें बजावीत आहेत की, प्रचलित स्त्री–शिक्षण बिलकुल कुचकामी आहे, प्रेमाच्या नादीं लागण्यांत कांही अर्थ नाही; कारण प्रत्यक्ष जीवनांत त्याला किंमत नाही, पुढे त्याचें पिठलेंच होतें इ० पण या मृगजळांच्या मागें धावावयास आम्हांला लाविले कोणी ? प्रेमविषाचा पेला, अमृत म्हणून आमच्या ओठास लावला कोणी ? आता ही गोष्ट सोडून द्या की, तारुण्य–सुलभ वृत्तीने, सॉक्रेटिसने काय धैर्य दाखविलें असेल त्यापेक्षाहि अमानुष धैर्य दाखवून हे प्रेमविषाचे पेले आम्ही गटागट प्यालों. पण त्यामुळें काळेनिळे होऊन पडल्यावर आता मात्र आम्हांला त्याच असें बजावीत आहेत ! आमचा दैवदुर्विपाक !! माता म्हणून त्यांच्या उत्संगीं जाऊन आम्ही दुग्धप्राशन केलें आणि त्याचें आम्हांस फळ काय मिळालें ? आम्ही तरुणी आज जवळजवळ सर्वच वृद्ध विद्वान् व विदुषींच्या टीकास्पद बनलों आहोंत. श्री. भाऊसाहेब माडखोलकरांनी आपल्या एका 'अग्रलेखां'त तर आम्हांला कितीं कितीं शेलकी विशेषणें दिलीं होतीं म्हणून सांगूं ? या निर्भर्त्सनेबद्दल आमचें हृदय किती विदीर्ण होत असेल ? किती आक्रोश करीत असेल ? त्यांत आम्ही अपराधी आहोंत का ? गेल्या तीस वर्षांच्या वाङ्मयाने आमचा अवतार घडविला याचें विस्मरण आमच्या विद्वानांना व विदुषींना होतें, पण आम्हांला होत नाही यांत काय आमचा गुन्हा आहे ? निव्वळ पोषाखी, स्वप्नाळू, सुखवादी, बेजबाबदार, तीव्र मद्याचे केवळ घटच बनविले गेलेल्या आम्हा तरुणींना; आमच्या वडील मंडळींनीच हिणवावें ? जन्मदुःखमयी जानकीप्रमाणेच, 'धरणीमाते दुभंग हो आणि मला पोटांत घे' (विवरं देहि मेधातर्) असा टाहो फोडीत धावत सुटावें असें आता आम्हांस झालें आहे. स्त्री–स्वातंत्र्य, स्त्रीचे समान हक्क इ० रंगीबेरंगी मदिरांचा कैफ आमच्यांत उत्पन्न केला कुणी ? त्याचें उत्तरदायित्व कोणावर ? आणि आम्हा तरुणांनाहि केवळ पोषाखी, पोकळ, स्रक् चंदन–वनिता–मय बनविलें कोणी ? 'हिंदोळ्या'वर आम्हांला झोके दिले कोणी ? 'कळ्यांच्या निःश्वासा'ने आम्हांस गुंगवून टाकिलें कोणी ? 'विभावरी'च्या मोहमय व निबिड तमाने आम्हांला अंध बनविलें कोणी ? हातावर तुरी देऊन स्वर्गांत उडून जाणाऱ्या उर्वशीच्या मागें नागव्याने धावत सुटणारा पुराणकाळीं एकटा पुरुरवाच झाला असेल ! पण आम्हां तरुणांच्या पिढ्याच पुरुरव्याप्रमाणे उल्लू बनविण्याचें कला–नैपुण्य कोणी कोणी दाखविलें ? सिंधुपात्रांतली शाई, गिरिवराच्या वृक्षराजीची लेखणी व पृथ्वीतलाचा कागद या गोष्टींहि ही यादी करावयास अपुऱ्या पडतील !!

आमची विलापिका

आम्ही आमची विलापिका कुठवर सांगावी ? आकाश फाटल्यासारखें आम्हांस झालें आहे. प्रस्ताव तरी कुणाजवळ करावा ? कारण जो जो भेटतो तो तो आम्हांला आपल्या भट्टींत तापवून मूर्तीतच ओतूं पहातो. गोऱ्या सोल्जरांच्या तडाख्यांत सापडलेल्या एखाद्या अनाथ अबलेप्रमाणे आमची नाही नाही ती विटंबना होत आहे. आमची इच्छा असो नसो, आमची तयारी असो नसो, आम्हांला कित्येक बौद्धिक बळजबरींना मान तुकवावी लागत आहे. आता मात्र आम्ही रंजलों आहोंत व आम्हांस असें निश्चित वाटूं लागलें आहे की, पूर्वीची पद्धतीच योग्य होती. ज्ञानाची द्वारें अगदी सताड उघडीं न करतां पात्र असलेल्यांनाच त्याचा अधिकार मिळावा व सर्वसामान्य समाजाने ज्ञानाच्या भरीस न पडतां त्या वर्गाने सांगितलें तसें वागावें हेंच योग्य आहे असें वाटूं लागलें आहे. ज्ञान पेलण्याचें व जिरविण्याचें सामर्थ्य किती लोकांत असतें ? त्याची वाऊगी चाऊटी झाली म्हणजे माणूस किती भरकटत व दाहावत जातो हें आजच्या युगाने आमच्या गळीं चांगलें उतरविलें आहे. पूर्वी असें होत असें की, शास्त्रीय गोष्टींची मीमांसा विद्वत्परिषदांच्या बंद

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आचारांत होत असे व त्यांतून निर्माण झालेलीं फळेंच तेवढीं सामान्य जनांच्या हातीं आयतीं पडत. त्यामुळे त्यांची बौद्धिक वाताहात होत नसे, बुद्धिभेद न झाल्यामुळे त्यांची जीवनयात्रा सुरळीत चालत असे व अखेरीस त्यांच्या जीवाचें सोनें होत असे. कांही बाबतींत असेंच घडत असल्याचें आम्ही पहात नाही काय ? पदार्थ-विज्ञान, वैद्यक-विज्ञान इत्यादि शास्त्रांतील रहस्यांचें व समस्यांचें चिंतन, मनन, विवाद कधींतरी पोटभरू वर्तमानपत्रांतून झळकले आहेत काय ? सामान्य जनांना त्यांचा आजहि किती पत्ता असतो ? त्यांच्या उपकारक फळांची गोडी चाखणें एवढेंच त्यांचें काम. परंतु धर्म, तत्त्वज्ञान, योग, स्त्री-पुरुषविषयक बिकट प्रश्न इत्यादि इ० गोष्टींची विचार-पीठें आज आमचीं पोटभरू नियतकालिकें व वर्तमानपत्रेंच बनलेलीं नाहीत काय ? या प्रश्नांचा लोकमत तयार करण्याशीं संबंध जडविणारे व त्यांना निव्वळ प्रचारकी पातळीवर उतरविणारे महाभाग यांना आम्ही काय म्हणून किंमत द्यावी ? चार पुस्तकांच्या पलीकडे ज्यांनी जगच पाहिलें नाही व मानवी जीवनाची विविधता व खोली ज्यांच्या बुद्धीस कधी शिवलीहि नाही, त्यांनी आम्हा तरुणांना आपला प्रयोगविषय बनवीत सुटावें याची आता आम्हांला मनस्वी चीड येत आहे. नको ते विद्वान, नको ती बुद्धिमत्ता असा उबग आम्हांस आला आहे. पूर्वी संत-मंडळींनी लोखंडाचे चणे खाऊन, टाकीचे घाव सोसून, कठोर साधना करून आपलें सामर्थ्य सामान्यजनांच्या प्रत्ययास आणून दिलें आणि म्हणूनच तें त्यांच्या मार्गानें उद्धरूनहि गेले. आजच्या आमच्या विद्वानांत या गोष्टीचें दुर्भिक्षच आम्हांस दिसतें. आणि तरीहि आम्ही त्यांच्या कच्छपीं लागून स्वतःचें वाटोळें करून घ्यावें !! आमचें देऊळ भंगून गेलें आहे पण आम्हांला एकाच गोष्टीचें पूर्ण समाधान आहे की, आम्ही आमचे विवाते नाही. परंतु ज्यांनी आम्हांस असें घडविलें त्यांचें तरी पुढें काय होणार ? यम-राजाच्या दरबारांत ते कोणत्या स्वरूपांत हजर राहणार ?"

अनेक तरुणांशीं सुख-संवाद करीत असतां त्यांची जी कैफियत प्रत्ययास आली ती मी माझ्या शब्दांत ग्रथित केली आहे. तरुण मंडळीस गोंधळांत टाकणाऱ्या व व्यामिश्र प्रतिपादनांनी त्यांना अर्जुनासारखे बनविणाऱ्या आमच्या थोरामोठ्यांनी त्यांना मार्गदर्शन करावयास नको काय ?

वि. सा. सं. ची रंगमंदिर-योजना

नागपूरच्या विशाल शहरांत अद्ययावत् साधनांनी सुसज्ज असें एकहि नाट्यगृह नाही. मध्यप्रदेशाच्या व नागपुरच्या कलात्मक आणि सांस्कृतिक जीवनांतील ही फारच मोठी उणीव आहे. ही उणीव दूर करण्यासाठी वि. सा. संघाने एक प्रशस्त रंग-मंदिर बांधण्याचा संकल्प केला आहे.

गेल्या वर्षप्रतिपदेला मा. पु. का. देशमुख, स्थानिक शासनमंत्री, म. प्र. यांचे हस्तें भूमिपूजन होऊन पायाचें काम पूर्ण झालें आहे व वरील कामास सुरुवात झाली आहे.

हें मंदिर भारतांतील एक अद्यावत व सुसज्ज असें रंगमंदिर होईल. नाटकें, व्याख्यानें इ० सर्व प्रकारच्या वाङ्मयीन, कलात्मक व सांस्कृतिक कार्यक्रमाकरितां सर्व भाषिकांना ह्या मंदिराचा उपयोग होऊं शकेल.

रंगमंदिराकरितां एकूण ३ लक्ष रुपये खर्च येणार आहे. ही रक्कम उभारण्याचें कार्य जनतेच्या सहकार्यानेंच वि. सा. संघ पूर्ण करील अशी आशा आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुण्यतिथीच्या निमित्ताने स्मरणार्थ

आधुनिक मराठी कविश्रेष्ठ : कै. भा. रा. तांबे

चंद्रकांत धांडे

"पेशवाईनंतरच्या काळांत, इंग्रजी आमदानींत कवि केशवसुतानंतर झालेले प्रतिभावान कवि" असा राजकवि कै. भास्कर रामचंद्र तांबे यांचा गौरव करण्यांत येत असतो. मराठी काव्यामध्ये राजकवि तांबे यांनी आपलें एक स्वतंत्र युग निर्माण केलेलें आहे. त्यांच्या कवितेवर कुणाहि कवीची छाप नाही. वयाच्या सोळाव्या वर्षापासून त्यांनी काव्यलेखनास प्रारंभ केला. महाप्रस्थानपर गीतें, शिशुगीतें, नाट्यगीतें, सामाजिक कविता, आणि गूढगुंजनपर कविता इत्यादि विविध प्रकारची काव्यरचना त्यांनी केली. तत्कालीन साहित्यिकांना राजकवि तांबे हे आपले मार्गदर्शक वाटत. अनेक कवींना त्यांच्या प्रोत्साहनाने नवदृष्टि प्राप्त झाली आणि ते नवकवि पुढे सरसावल्यामुळे मराठी काव्यशाखेची मोठ्या प्रमाणांत वाढ झाली. राजकवि तांबे यांचा पत्रव्यवहार दांडगा होता. मनमोकळेपणाने ते पत्रांतून आपले विचार व्यक्त करीत. प्रा. मायदेव, प्रा. भवानीशंकर पंडित, प्रा. कानेटकर, प्रा. पराडकर, डॉ. श्रीखंडे, डॉ. माधवराव पटवर्धन, साहित्यसम्राट कै. केळकर, श्री. के. ना. डांगे आणि श्री. गोपीनाथ तळवलकर वगैरे नामवंत साहित्यिकांशीं त्यांनी केलेला पत्रव्यवहार पुस्तकरूपाने उपलब्ध झाला असून त्यावरून त्यांच्या काव्याविषयीं विस्तृत प्रकारची माहिती मिळणें शक्य झालें आहे.

राजकवि भा. रा. तांबे यांचा जन्म दि. २७ नोव्हेंबर १८७४ या दिवशीं मध्यभारतांतील 'मुगावली' या गांवीं झाला. त्यांचें प्राथमिक शिक्षण झांशी आणि मुगावली येथे झालें. दुय्यम शिक्षणाकरिता ते 'देवास' या गांवीं आपल्या आजोबांकडे गेले. बालवयांतच त्यांना पांडवप्रताप, रामविजय, तुलसीरामायण इत्यादि ग्रंथांची गोडी लागली होती. इंग्रजी शाळेत जाऊं लागल्यानंतर ते करमणुकीखातर इंग्रजी कवितांचा मराठी कवितांत अनुवाद करूं लागले. हाच त्यांच्या काव्याचा प्रारंभ होय.

सन १८९३ मध्यें म्हणजे आपल्या वयाच्या एकोणिसाव्या वर्षी भास्करराव अलाहाबाद विश्वविद्यालयाची शालान्त परीक्षा प्रथम श्रेणींत उत्तीर्ण झाले. त्यांना इंदूर येथील कॉलेजांत प्रवेश मिळाला पण आर्थिक अडचणींमुळें ते आपलें महाविद्यालयीन शिक्षण घेऊं शकले नाहीत. यामुळे ते उदास आणि निराश झाले पण हें औदासिन्य फार काळ टिकलें नाही. लेले गुरुजी हे भास्कररावांचे मार्गदर्शक होते. आपल्या विद्यालयांत अध्यापक म्हणून त्यांनी भास्कररावांची नियुक्ति केली. थोड्याच दिवसांत 'राजकुमाराचें अध्यापक' या नात्याने त्यांचा देवासच्या संस्थानांत प्रवेश झाला. यावेळी भास्कररावांनी मिळेल त्या वेळांत संस्कृत आणि इंग्रजी वाङ्मयाचें यथाशक्ति अध्ययन आणि रसग्रहण केलें.

भास्करराव एकवीस वर्षांचे असतांना त्यांचा "वारुबाई" यांशीं विवाह झाला. यावेळीं भास्कररावांनीं लिहिलेल्या काव्यामध्यें प्रणयप्रधान काव्य मोठ्या प्रमाणावर होतें; पण ते अतिउत्तान स्वरूपाचें वाटल्यामुळे भास्कररावांनी नष्ट केलें. "डोळे हे जुल्मि गडे" हें भावगीत त्यांनी या काळींच लिहिलेलें आहे असें सांगण्यांत येतें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९०० साली राजकुमाराचे पालक म्हणून भास्करराव इंदूर मुक्कामी गेले. यावेळी परिचय झालेलें मित्र, पुस्तकें आणि अनुभव यांचा त्यांच्या साहित्यावर परिणाम झाला. १९०७ सालीं जळगांवीं भरलेल्या कविसंमेलनांत त्यांचा अनेकांशीं परिचय झाला. संस्थानी प्रदेशांतच–दिवाण–पोलीसखात्याचे अधिकारी, संस्थानचे सुपरिटेंडेंट, न्यायाधीश, शिक्षणखात्याचे रजिष्ट्रार अशा विविध नोकऱ्या त्यांनी केल्या. १९३५ सालीं त्यांना कोल्हापूर कविसंमेलनाचें अध्यक्षस्थान देऊन रसिकांनी त्यांचा गौरव केला तर १९३७ सालीं "राजकवि" म्हणून त्यांचा सन्मान झाला. सेवानिवृत्ती नंतर ग्वालेर येथे ते स्थायिक झाले होते आणि तेथे असतांनाच वयाच्या ६७ व्या वर्षी दि. ७ डिसेंबर १९४१ या दिवशीं त्यांनी जगाचा निरोप घेतला.

"स्त्रीपुरुषांचे कवि"

राजकवि भा. रा. तांबे यांना जाऊन सुमारे सव्वा तप लोटलें आहे पण त्यांच्या काव्याची स्थिति "प्रतिपर्वरसावहम्" अशी आहे. जें–जे रसिक पुढे होऊन त्यांच्या काव्याचा आस्वाद घेतील त्यांना ते अधिकाधिक गोड वाटेल. विदर्भातील नामवंत साहित्यिक प्रा. भवानीशंकर पंडित त्यांच्या काव्याबद्दल म्हणतात—

"ब्राउनिंगप्रमाणें राजकवि तांबे हे स्त्री पुरुषांचे कवि होते. स्त्री–पुरुषांच्या भावनांना तोंड फोडण्यांत आणि हळुवारपणें त्यांची गुंतागुंत उलगडण्यांत त्यांना कमालीचें यश लाभलें होतें; म्हणूनच मराठी नाट्यगीतांचें जनकत्व त्यांच्याकडे जाते. त्यांनी निर्माण केलेले काव्यात्म स्त्री–पुरुष रसानुकूल स्वरांत बोलतात आणि भावनेच्या अनुरोधानें हालतात व चालतात. यामुळे त्यांच्या काव्याला संगीत व नाट्य यांची जोड मिळाली आहे. आपल्या पात्रांना उठाव देण्यासाठी त्यांनी पार्श्वभूमिप्रमाणें निसर्गाचा उपयोग केला आहे. त्यामुळे त्यांचीं शब्दचित्रें स्पष्ट उमटलेलीं आहेत त्याचप्रमाणें काव्य, चित्र आणि संगीत या तीन ललितकलांचा सुरेख संगम त्यांच्या लेखनांत झालेला आहे."

शृंगारिक काव्यें

राजकवि तांब्यांसारखी सुन्दर शृंगारिक काव्यरचना अलिकडील कुसुमाग्रजांसारख्या फारच विरळ कवींच्या काव्यांत दिसून येते. मात्र या रचनेंत त्यांच्या काव्यांत सारखें प्रभावी स्वरूप नाही. राजकवि तांबे यांच्या रचनेच्या थोड्या फार छटा, थोडे फार पडसादच त्यांत उमटलेलें दिसतात असें म्हणावेंसें वाटतें. राजकवि तांब्यांच्या एका शृंगारिक काव्यावरून एक सुंदर दृश्य समोर उभे राहतें. कुणीतरी तरुण कशिदा काढीत बसलेल्या आपल्या प्रेयसीकडे डोळे भरून बघून एक प्रकारचें सुखपान करीत आहे, पण ती तरुणी संकोचली आहे. ती म्हणते—

"डोळे हे जुलमि गडे रोखुनि मज पाहुं नका !
जादुगिरी त्यांत पुरी येथ उभे राहुं नका.
घालुं कशी कशिदा मी ? होती किति सांगु चुका !
बोचे सुई फिरफिरुनी वेळ सख्या, जाय फुका."

राजकवि तांबे यांच्या जीवनाकडे बघणाऱ्या थोर दृष्टीची कल्पना आणून देणाऱ्या अनेक कविता त्यांच्या संग्रहांत आहे. पती आणि पत्नी हे दोन जीव संसाररूपी धाग्याने बांधले म्हणजे जीवनाचें सार्थक झालें असें नाही तर हे दोन जीव अगदी एकरूप झाले पाहिजेत. एकाचें दुःख तेंच दुसऱ्याचें दुःख आणि एकाचें सुख तेंच दुसऱ्याचें सुख ! त्यांच्या "कुणि कोडें माझें उकलिल का ?" या कवितेंतील नायक आपल्या प्रियेस म्हणतो—

"गुलाब माझ्या हृदयीं फुलला,
रंग तुझ्या गालावर खुलला;
कांटा माझ्या पायीं रुतला,
शूल तुझ्या उरिं कोमल कां ?"

एका तरुणीस एकाएकीं कांही तरी दुखणें झालें. घरांतील वडील माणसें म्हणूं लागलीं—"तिला दृष्ट झाली बरं !" रोग एक आणि निदान भलतेंच ! प्रणयाने ती तरुणी बेभान झालेली होती. साऱ्या आयाबायांनीं गर्दी केली. कुणी जगदंबेचा अंगारा घेऊन आले, कुणी लिंबलोण उतरून टाकण्याची तयारी केली. कुणी मांत्रिकांनाहि पाचारण केलें. पण कशा या वृद्ध

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्त्रिया ? आपल्या तारुण्याचा अनुभव घेऊनहि मायेने त्या बांधलेल्या झाल्या होत्या. त्या प्रेमाने झपाटलेल्या तरुणीचें खडें स्वरूप राजकवि तांब्यांनी रसिकांसमोर उभे केलें आहे—

"चाफ्यापरि गोरेपण पिवळें,
काकडीपरी अंग कोंवळें,
मेंद्यापरि लुसलुशीत सगळें
दृष्ट पडुनि करपली !"

या कवितेमध्ये राजकवि तांब्यांनी रसिकवृन्दास चांगलाच धक्का दिलेला आहे. "दृष्ट हिला लागली" असें म्हटल्यास बरोबर कुणीतरी गोंडस बालिका अंगणांत खेळत असतांना दृष्टावली असावी असें वाटतें पण कवितेचें खरें स्वरूप समोर येतांच कवीच्या कल्पकतेचें कौतुक वाटल्याशिवाय राहात नाही !

मानवी जीवनांत अनेक संकटें असतात. त्या संकटांना तोंड देणें हेंहि एक दिव्यच आहे. "जगीं सर्व सुखी असा कोण आहे" हे श्रीसमर्थ रामदासस्वामींचे उद्‌गार विचारांत घेण्याजोगे आहेत. पण राजकवि तांबे आशावादी होते. त्यांच्या साहित्यांतून निराशेचे स्वर मुळीच निघाले नाहीत. विवाहापूर्वीहि त्यांनी लिहिलेल्या काव्यांतील शृंगार जिवंत वाटतो. त्यांत मुळीसुद्धा कृत्रिमता नाही. "सहज तुझी हालचाल" या कवितेंतील नायकाच्या द्वारें त्यांनी आपल्या जीवनांतील सुखाचे आणि समाधानाचें चित्र रसिकांपुढे सादर केलें आहे. सुखी संसाराने ते मुग्ध झाले आहेत.

"ही अपूर्व शक्ति सगुण
झाडितसे मम अंगण,
हें माझें भाग्य बघुन
जळफळतील देव ते"

राजकवि तांबे यांच्या प्रणयकाव्याचें उगमस्थान त्यांच्या पत्नीच होत. ते आपल्या एका रसिक–कवि-मित्रांस पाठविलेल्या पत्रांत म्हणतात—

"माझीं सारीं प्रेमगीतें मला माझ्या पत्नीवरील प्रेमामुळेच लिहितां आलीं. मी जर प्रीतीचा आस्वाद घेतला नसता तर तिच्या अभावीं प्रीतीची एकहि ओळ मला खरडतां आली नसती"—"माझें काव्य माझ्या जीवनाबरोबर वाढलें" असेहि उद्‌गार त्यांनी काढले होते. त्यांच्या कांही कवितांमध्ये तत्त्वज्ञानहि दिसून येतें. "नववधू प्रिया मी" या कवितेंत नुकत्याच विवाहबद्ध झालेल्या, पतीला संकोचणाऱ्या आणि भिणाऱ्या तरुणीच्या निमित्ताने त्या परमात्म्याशीं मीलन घडविलें आहे.

"आता दीनदयाघना, चरणिं रे ही एकचि ›   ा,
नेतां पुण्यमयी प्रिया तिजसवे ने पातकी या ज॰ा."

वरील उद्‌गारहि राजकवि तांब्याचें आपल्या पत्नीवरील निस्सीम प्रेम व्यक्त करणारे आहेत. राजकवि तांबे यांनी रचलेल्या कवितांत 'माळीण' ही फारच रंगेल कविता आहे. असा शृंगार दुसऱ्या कोणत्याहि कवितेंत सापडत नाही अशी ही वैशिष्ट्यपूर्ण कविता आहे. या कवितेंतील माळीण आपल्याकडे फुलें घेण्याकरिता आलेल्या ग्राहकास म्हणते—

"तुला न देईन माला
जा जा चाल घराला.
"मोठा-मोळा, घालिशि डोळा, हारिन हा पाचोळा"

माळीण त्याला प्रणयाने धुंद झालेलीं उत्तरें देते. "तुझ्या गालाला, दाताला आणि जिवालाच विचार" असेंहि ती म्हणते. "फुलें वखतोस खरा पण काटांच हातीं येईल" असें म्हणून माळीण त्याला चिडवूं बघते पण तो म्हणतो—

"हतुं दे कांटे चलाख माळिणि, खुपुं दे ग कलिज्याला !"

आधुनिक मराठी काव्यांत सुन्दर प्रेमगीतांच्या निर्मितीचें यश राजकवि तांब्याकडेच आहे. वयाच्या शेवटीं म्हणजे १९४२ सालांत लिहिलेल्या कवितेंत एका नवतरुणीस "कुठें जातेस मुली ?" म्हणून थांबविलें आहे. ते म्हणतात—

"या काळवेळेस निघतात वेताळ
नाचोन खिदळोन बेताल गातात !
बाई, शरीरास उन्मादकर वास
तो आवडे यांस येतील अंगांत !!"

वरील सर्व वैशिष्ट्ये विचारांत घेतलीं असतां राजकवि तांब्यांच्या मराठी काव्यांतील श्रेष्ठ आणि

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्रेष्ठ स्थानाची जाणीव होते. अनेक साहित्यिकांनी वेळोवेळीं त्यांचा गौरव केलेला आहे. पुण्याचे ख्यातनाम प्राध्यापक आणि टीकाकार श्री. रा. श्री. जोग यांनी "प्रेमाचे शाहीर" असें नामाभिधान राजकवि तांब्यांना मोठ्या कौतुकानें योजिलें आहे, ते युक्तच होय. तांबे कवींच्या काव्यांत प्रणय-शृंगार आहे पण तो अतिरेकी नाही. तो संयमशील आणि पवित्र आहे म्हणूनच त्यांची कविता गोड झालेली आहे.

राजकवि तांब्यांचीं शिशुगीतें

राजकवि तांब्यांच्या समग्र काव्यांत कांही शिशुगीतेंहि आलेलीं आहेत. चिवचिव चिमणी, आनंदी आनंद, हें कोण गे आई ?, तर मग गट्टी कोणाशीं !, अंगाई गीत, इत्यादि शिशुगीतांचा उल्लेख करणें आवश्यक आहे. चिव-चिव चिमणी या कवितेंतील भाव फारच प्रभावी आहेत. आनंदी-आनंद या कवितेनें बालकांना गाणें म्हणून नृत्य करण्यास मोठाच अवसर दिला. अंगाई गीत-वगैरे शिशुगीतें फारच लोकप्रिय आहेत. वारा सूंऽ सूंऽऽ करून वाहत आहे, त्या आवाजाने भेदरलेले बालक आपल्या आईच्या कुशीत शिरून विचारीत आहे-"हें कोण गे आई"? भीति वाटत असली तरी उत्सुकता कमी होत नाही-एकप्रकारचा आनंद या कुतूहलामागे दडलेला आहे-

"झाडाच्या साऊल्या नदींत कापल्या.
हांका मीं मारिल्या वांकोल्या ऐकिल्या.
उरांत घडघडे; धावतां मी पडे
पळालों तेथून- कोण ये मागून ?"

या ओळीं त्यादृष्टीने विचारांत घेण्यासारख्या आहेत. "तर मग गट्टी कोणाशीं !" ही विनोदी कविता आहे. या कवितेंत भावाने बहिणीला चिडविण्याचा प्रयत्न केला आहे. तिच्या भावी पतीविषयींचे विचार या कवितेंत व्यक्त झाले आहेत. आज सर्वजण तिच्यावर रुसले तर ती नवा मित्र करील हेंच जणूं यांत दाखवावयाचें आहे असें वाटतें-

"कशी कशी
आज अशी
गम्मत ताईची खाशी !"

"आतां गडी फू दादाशीं
"तर मग गट्टी कोणाशीं ?"—

--"निसर्गवर्णन"—

राजकवि तांबे हे बहुगुणी-बहुअंगी कवि होते. म्हणूनच त्यांनी मराठीकाव्याचे विविध प्रकार हाताळून त्यांत यश आणि प्रावीण्य संपादन केलें. "Sonnet" या इंग्रजी काव्यप्रकारची मराठी काव्य रचना प्रथम केशवसुतांनी केली. त्यांनी एका प्रकाराला वाढविलें तर राजकवि ताव्यांनी दुसऱ्या प्रकाराला नावारूपास आणलें. "गेली ज्योति विझोनिया" या त्यांच्या कवितेबद्दल स्वतः केशवसुतांनी धन्योद्गार काढल्याचें विदितच आहे.

गुराख्याचें गाणें; सोन्याची घेऊनि करिं झारी, रुणुझुणु ये, ये पहाटचा तारा गगनीं या कवितांमध्ये निसर्गवर्णन आलेलें आहे. "रुणझुणु ये" हें तर तांब्यांचें नांवाजलेलें वात्सल्यगीत आहे. या गीतांतील सौंदर्य मुग्ध करून सोडणारे आहे—

"दिग्ललना धौतमुखी
रत्नदीप कनकतबकीं
घेउनिया बाहति या बालभास्करा"ला

तसेंच—"रजनितनय मारुतगण
नृत्य करिति चपलचरण,
तोम् तनन झुम् झनन करिति गायनाला"

यांतील कल्पनाशक्तीप्रमाणेंच नादमाधुर्यहि विचारांत घेण्यासारखें आहे. आपल्या हातीं सोन्याची झारी घेऊन पहाटेची देवता उषादेवी राजकवि तांब्याच्याकडे आलेली आहे. तिचें वर्णन करतांना राजकवि तांबे म्हणतात—

"करतल पदतल कोमल रक्तिम
गुलाब फुलले जसे मनोरम,
सुवर्णकांति फांके अनुपम
ही आज मला हांका मारी"

"घनतमीं शुक्र बघ राज्य करी" या कवितेंत निसर्गवर्णनाच्या द्वारें त्यांनी मानवी मनास आशेचा किरण दाखविला आहे. या कवितेंत निरनिराळे दृष्टांत

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

देऊन राजकवि तांब्यांनी मानवी मनास प्रतिकूल परिस्थितीला तोंड देण्याचा मार्ग दाखविला आहे.

"फूल गळे, फळ गोड जाहलें,
बीज नुरे, डोलांत तरु डुले,
तेल जळे बघ ज्योत पाजळे
का मरणिं अमरता ही न खरी ?"

'मधुघट' आणि 'रुद्रास आवाहन'

या दोन कविता राजकवि तांब्याचें भाव-कवित्व सिद्ध करण्यास समर्थ आहेत. एकीमध्ये करुणरसाचा परमोच्च बिन्दू तर दुसरीमध्ये त्याच प्रमाणांत तीव्र त्वेष ! प्रणयकाव्यांत वेगळीच उत्कटता आणि उच्चप्रकारचें भावदर्शन असतें तसेंच वरील कवितांतहि आहे. राजकवि तांब्याची काव्यरचना रागगायनास पोषक असल्यामुळें तिला वेगळेंच यश प्राप्त झालें आहे. राजकवि तांबे यांनी रुद्रास आवाहन या कवितेद्वारें "वीरभद्र" जाति प्रथमच मराठींत आणली. राजकवि तांब्यांचें एक वैशिष्टच असें कीं त्यांची कुठलीहि ओळ घ्या, त्या एक एका ओळीमध्ये एक विधान पूर्ण होते. हें रचनाकौशल्य होय ! नादमाधुर्यामुळें त्यांच्या काव्यास गेयता आलेली आहे. समाजाच्या हीन कुजक्या मनोवृत्तींत बदल घडावा असें त्यांना वाटत असलें तरी या जगांत त्यांना तशी शक्यता दिसत नाही; म्हणून ते शंकराला या पृथ्वीचा नाश करून नवीन पृथ्वी निर्माण करण्याकरिता पाचारण करतात. केशवसुतांनीहि याच उद्देशाने "तुतारी" फुंकली होती, पण यापुढें ती फिकी वाटते. वीर आणि भयानक रसाचा या कवितेंत प्रत्यय येतो. न्याय आणि समानता प्रस्थापित होण्यासाठी राजकवि तांबे रुद्राला सांगतात—

"पाड सिंहासनें दुष्ट हीं पालथीं,
ओढ हत्तीवरुनि मत्त नृप खालती,
मुकुट रंकास दे करटि भूपाप्रती,
झाड खट् खट् तुझे खड्ग क्षुद्रां !"

राजकवि तांब्यांच्या काव्यलेखनांत खंड पडला असतां त्यांच्या एका रसिकमित्राने एक जाहीर पृच्छात्मक कविता लिहिली. त्या कवितेस त्यांनी लिहिलेलें उत्तर म्हणजेच 'रिकामे मधुघट' ही कविता होय. या कवितेंत शांतरस पूर्णपणें भरलेला आहे. त्यांच्या धार्मिक भावनाहि या कवितेंतून व्यक्त होतात. आपल्या काव्यरूपी मधाचा प्रवाह आटला आहे हें सांगतांनाहि त्यांनी रसिकांना मधाचे घोट पाजले आहेत. त्यांचें जीवनावरील रूपक कितीतरी सार्थ आहे—

"ढळला रे ढळला दिन सखया
संध्याछाया भिवविति हृदया
आतां मधूचें नांव कासया ?
लागले नेत्र रे पैलतिरीं"

सामाजिक कविता

राजकवि तांबे यांच्या अनेक काव्यांतून सामाजिक विषय आलेले आहेत. त्यांची कांही "विधवा गीतें" रसिकांच्या मनावर परिणाम करणारीं आहेत. ही गीतें वाचून तांबे हे प्रत्येक कविता किती एकरूपतेनें लिहित होते तें दिसून येतें. त्यांच्या एका कवितेतील विधवा एका सुखद स्वप्नांत मग्न झालेली आहे. प्रत्यक्षांत सुख तर फारच दूर आहे. तिला स्वप्नांत फारच सुन्दर दृश्य दिसलें त्यामुळे स्वप्नांतच नेहमी राहावें असे तिला वाटतें—

"स्वप्नांत उद्यान, नदी विशाला,
जोत्स्ना सुरम्या, बघतां प्रियाला,
तेथे तृषार्ती नयनीं पिऊनी
आनंद होतां हसलें, तयांनी"

"सूर्याचा प्रकाश आहे तोंवर पृथ्वीवर चैतन्य आहे. तो मावळला की सर्वत्र अंधार होतो तसेंच विधवेचें ! पती नाहीसा झाला की पत्नीचें जीवन निर्माल्य बनतें—

"फूल सूर्यमुखि भूवरि, नभिं रवि,
चंडकिरणिं मुख अविरत फिरवी,
जाता तो मुख दुःखें झुकवी,
जळुनि राख हो किरणिं, हें तसें !"

हें तिसरें दृश्य ! मुलें बाळें, भरलेला संसार असतांना त्या सुखी संसारावर परमेश्वराने आकाशींची कुऱ्हाड लोटली. ती तरुणी अनाथ झाली. नदीकांठावर येऊन उडी टाकण्यासाठी ती तयार झाली पण "आई !

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आई" या शब्दांनी तिच्या हृदयाचा ठाव घेतला. ती मागे फिरली—

" घे ओढुनि पोटीं वत्साला,
मोलमजूरी करीन बाळा,
भिक्षा मागिन रे वेल्हाळा !
परि भरीन हीं तोंडें चिमणीं ! "

राजकवि तांब्यांच्या काव्यांतील चौथी विधवा समाजाची पर्वा न करणारी आहे. परिस्थितीचा घाला संसारावर पडलेलाच आहे. मदत करण्यास कुणी पुढे येणार नाही. मग समाजाचीं दूषणें काय कामाचीं ?—

" कुणि कसें म्हणा, कुणि करा हवें तें आता
ते कांत यापुढे, मीहि तयांची कांता
कुणि म्हणाच पापिण, म्हणाच कुलटा आता,
तो एक जाणतो मला, माझिया नाथा "

"महाप्रस्थान"

एकादें साधें दृश्य मनासमोर दिसतें आणि मनांत मरणाचे विचार सुरू होतात. हे विचार कांहीं केल्या थांबत नाहीत. आपला जन्म कशासाठी ? या जीवनांतील आपलें कार्य काय ? या पृथ्वीवर आपलें स्थान कोणतें ? या विचारांनी मन भांबावून जातें. राजकवि तांब्यांच्या समग्र काव्यांत "आव्हानशृंग, महाप्रस्थान, घाबरूं नको, बावरूं नको, आलों, थांबव शिंग !, जनपळभर म्हणतिल, "हाय हाय !" निरोप घेतांना, मरणांत खरोखर जग जगतें, उदारचन्द्रा आणि गाडी बदलली" अशा एकूण नऊ महाप्रस्थानपर कविता आहेत. मृत्यूची हांक कानीं आल्याने त्यांना थोडें भय वाटलें आहे. आजारी असतांना घाबरून न जातां त्यांनी आपलें मन स्थिर ठेवून त्यास धीर दिला आहे. पुन्हा त्यांनी मरणाशीं युद्ध करण्याची तयारी केली आहे. त्यांना बोलावण्यासाठी परमेश्वराने शिंग वाजविण्यास प्रारंभ केला, पण ते महाप्रस्थानासाठी तयारच होते. म्हणून ते म्हणतात—"आलों थांबव शिंग !" किती सामर्थ्य या उद्‌गारांत भरलेलें आहे ! तसेंच "रामकृष्णहि या जगांत येऊन गेले. त्यांच्यावाचून जगाचें कांहीच अडून राहिलें नाही मग मी कोण ?" हे विचारहि फारच खंबीरपणाचे आहेत. जीवन हें मरणासाठीच आहे हें सांगतांना ते म्हणतात—

"मरणांत खरोखर जग जगतें;
अधि मरण, अमरपण ये मग तें"

या महाप्रस्थानपर कवितांविषयी महाराष्ट्रांतील श्रेष्ठ साहित्यिक श्री. वि. स. खांडेकर म्हणतात—

"जीवनसागराला काळओहटी लागली असतांना त्याच्या आंत ओढणाऱ्या लाटांवर डौलाने नृत्य करणारी ही कलानौका पाहून मन चकित झाल्यावाचन राहात नाही."

शेवटीं राजकवि भा. रा. तांबे यांनी जगाचा निरोप घेतला आहे. शब्द साधे पण रसिकांच्या हृदयाला खोलवर भिडणारे आहेत. रसिक त्यांना कदापि विसरणार नाहीत.

"सारे प्रेमीजन
करा बोळवण,
पुढे आठवण
राहूं द्यावी "

मराठवाड्यांतील एकमेव मराठी मासिक
मराठवाडा साहित्य परिषदेचें मुखपत्र

प्रतिष्ठान

दर महिन्याच्या १ तारखेस प्रसिद्ध होतें
समीक्षा, ललित, काव्य, संशोधन इत्यादि
विषयांवरील मौलिक साहित्य

आजच वर्गणीदार व्हा

वार्षिक वर्गणी रु. ५ किरकोळ अंक ८ आ.
जाहिराती स्वीकारल्या जातात
मराठवाड्याबाहेर एजन्सी देणें आहे. लिहा.

" प्रतिष्ठान " कार्यालय,
इसामिया बाजार,
हैदराबाद-दक्षिण.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

खाडिलकरांचीं संगीत नाटकें

द. रा. गोमकाळे

नाट्याचार्य काकासाहेब खाडिलकर संगीताकडे वळण्यापूर्वी 'आपल्या पंचशरें गद्य बरें' यांनी कीर्तीच्या अत्युच्च शिखरावर विराजमान झाले होते. त्यांचा प्रतिभासूर्य त्या वेळीं आपल्या भव्य, उदात्त व प्रखर ध्येयाविष्कारामुळे महाराष्ट्रीय नाट्याकाशांत तेजाने तळपत होता. त्यांचीं नाटकें यशस्वी करून दाखविणारी महाराष्ट्र नाटक मंडळी व त्या नाटकमंडळींतील गुणवान नटसंच खंबीर पायावर उभे होते. असें असतांहि खाडिलकर संगीत नाटकांकडे कां वळले व त्याचा परिणाम त्यांच्या नाट्यलेखनावर, नाटकांतील वातावरणावर कसा झाला, या गोष्टींचा विचार काकासाहेबांच्या नाटकांचा अभ्यास करणाऱ्यांनी अवश्य केला पाहिजे.

ऐश्वर्याच्या काळांत आपलें निर्वेध सत्तारूढ आसन सोडून दुसरी अनोळखी वाट चाल प्रयत्नवादाच्या बळावर करण्याचा प्रयत्न करणें मनुष्याचा साहजिक स्वभाव खास नाही. मग काकासाहेबांच्या वाङ्मयजीवनांत हा असा बदल कां घडून आला ? पांच यशस्वी गद्य नाटकें लिहिल्यानंतर पांच संगीत नाटकें लिहिण्याचा काकासाहेबांनी संकल्प केला असें कै. वा. श्री. टेंबे यांनी सांगितलें आहे. परंतु हा त्यांचा निर्धार सहजगत्या स्वाभाविकपणें त्यांनी केला असेल असें वाटत नाही. काकासाहेबांचीं बहुसंख्य नाटकें कलेच्या दृष्टीने वरच्या श्रेणीचीं आहेत. परंतु खाडिलकरांच्या प्रतिभेचा तत्त्वचिंतक ध्येयात्मता हाच स्वाभाविक व प्रधानधर्म आहे. त्यांच्या यशस्वी नाटकांत ध्येयात्मतेच्या बरोबर रंजनात्मकता खेळीमेळीने एकजीव होऊन नांदते. परंतु खाडिलकरांची प्रतिभा संगीताकडे वळतांच 'खाडिलकरांनी ध्येयात्मकतेकडून रंजनात्मकतेकडे आपला मोर्चा वळविला' असें काकासाहेबांचे अत्यंत अभिमानी गु. दादासाहेब बनहट्टी यांनीहि म्हटलें आहे. 'स्त्रीजातीची महति वर्णन करणारा 'प्रेमाचा शाहीर' 'पौरुषयुक्त ओजस्वी शृंगाराचा अद्वितीय प्रणेता' या लालित्यपूर्ण वचनांनी रसिकराज प्रो. फडके यांनीहि काकासाहेबांच्या नाट्यकर्तृत्वाचा गौरव केला. दादासाहेब बनहट्टी व प्रा. फडके यांच्या अभिप्रायांत काकासाहेब खाडिलकर संगीत नाटकाकडे वळल्यानंतर घडून आलेल्या परिणामतः वस्तुस्थितीचेंच दर्शन आहे. पौरुषयुक्त ओजस्वी शृंगार, स्त्रीजातीची महति वा रंजनात्मकता या गोष्टीच खाडिलकरांच्या संगीत नाटकांत प्रामुख्याने आढळतात. त्यांची दीप्तिमान प्रखर ध्येयात्मकता त्यांच्या गद्य नाटकांतच प्रकर्षाने आढळते. खाडिलकरांचें राजकीय जीवन लोकमान्य टिळकांच्या परंपरेंत विकास पावलें व त्याचें स्पष्ट प्रक्षोभकारी प्रतिबिंब त्यांच्या 'कीचकवध' व 'भाऊबंदकी' नाटकांत स्पष्टतेने पडलें—१९२० सालानंतर ते महात्मा गांधींच्या परंपरेंत संपूर्णतः सम्मिलित झाले. असें असतांहि टिळकांच्या संप्रदायापेक्षा महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानाचाच ठसा ज्या नाटकांवर प्रभाविताने दिसतो असें त्यांचें 'सत्त्वपरीक्षा' नाटक १९१४ सालीं लिहिलें गेलें, यावरून ध्येयप्रधान तत्त्वचिंतकाची भूमिकाच त्यांच्या गद्य नाटकांच्या लेखनांत प्रधान होती हें स्पष्ट दिसतें. त्यांचीं पहिलीं पांच गद्य नाटकें व त्यांतून सर्वांत अधिक गाजलेलीं 'कीचकवध' व 'भाऊबंदकी' नाटकें वाचल्यानंतर त्यांचीं संगीत नाटकें वाचलीं तर काकासाहेबांच्या मनोवृत्तींत, त्यांच्या प्रखर ध्येयाविष्कारांत, नाट्यप्रसंगांच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रचनेच्या उत्कटतेंत, वाचक-प्रेक्षकांच्या अंत:करणांत उसळविणाऱ्या आंदोलनांत एकदम बदल झाला असें दिसून येईल. गद्य नाटकांत सळसळून व्यक्त होणारें प्रखर प्रक्षोभकारी राजकीय वातावरण व दीप्तिमान ध्येयाविष्कार त्यांच्या संगीत नाटकांत अधिकांशानें लोपला असल्याचें कोणालाहि सहज दिसून येईल.

हें असें एकाएकी कां झालें या कोडयाचें उत्तर काकासाहेबांना ज्यांनी जवळून पाहिलें व त्यांच्या मनोवृत्तीचा त्यांच्या निकट सान्निध्यांत राहून ज्यांनी अभ्यास केला तेच यथार्थतेने देऊं शकतील. खाडिलकरांची अभिजात कला, त्या कलेंतून व्यक्त होणारें जीवन-साक्षेपी वातावरण, जीवनांतील आदर्शाकडे, राष्ट्र-समाजहिताकडे आढळून येणारा त्यांचा कटाक्ष व शाश्वत सत्याच्या आविष्काराकडे सतत रोखून असलेली त्यांची मनोवृत्ति त्यांच्या कोणत्याहि नाटकांत निश्चयानें आढळते. काकासाहेबांच्या अगदी पहिल्या 'सवाई माधवरावांचा मृत्यु' या नाटकाकडे आपण पाहिलें तरी त्यांचा मूलत: पिंड तत्त्वचिंतकाचा तसाच खऱ्या कलावन्ताचा होता व त्याला खऱ्या कलावन्ताप्रमाणे आपल्या जीवन-साक्षात्कारी ध्येयप्रधान तात्त्विक भूमिकेची त्यांनी जोड दिली होती असें दिसून येईल. परंतु त्यांच्या गद्य नाटकांनी वाचक प्रेक्षकांच्या अंत:करणांत जीं प्रक्षोभकारी आंदोलनें निर्माण होतात, त्या नाटकांतील जीवनदर्शनानें प्रचलित परिस्थितीबद्दलचा आवेग रक्त सळसळावयास लावून परिणाम घडवितो; तसा परिणाम, त्यांचीं संगीत नाटकें वाचून अथवा पाहूनहि होत नाही. संगीत नाटकांच्या बाबतींत हा घडून आलेला बदल काकासाहेबांच्या प्रतिभाधर्मांत घडलेल्या स्वाभाविक परिवर्तनामुळे घडून आला असें वाटत नाही. किंबहुना तो काकासाहेबांच्या शक्तिबाहेर असलेल्या बाह्य परिस्थितीमुळे घडून आला असावा अशी दाट शंका येते.

काकासाहेबांच्या संन्निध राहण्याचें किंवा त्यांचा प्रत्यक्ष परिचय होण्याचें भाग्य मला लाभलें नाही. तरी सभोंवारची परिस्थिति, अपवादात्मक असे काकासाहेबांनी स्वत:च्या शब्दांत केलेले खुलासे व त्यांच्या नाटकांच्या स्वरूपांत घडून आलेला बदल यांच्या अनुरोधानें आपण विचार केला तर तर्कशुद्ध अनुमानाच्या साहाय्यानें या बदलाचें कारण सांगतां येण्यासारखें आहे असें वाटतें. यासाठी खाडिलकरांच्या पहिल्या संगीत 'मानापमान' नाटकाच्या वेळचा थोडासा इतिहास अवलोकन केला तर या कोडयाचें तर्कबुद्धीला पटेल असें उत्तर शोधतां येण्यासारखें आहे.

१९०६ सालीं खाडिलकरांचें 'कीचकवध' हें नाटक महाराष्ट्र नाटकमंडळीने रंगभूमीवर आणलें. कथानक पौराणिक असलें तरी तरी कीचकाची प्रत्येक हालचाल, प्रत्येक शब्द तत्कालीन राजकीय परिस्थिति व शासनकर्ते अशा उत्कट रीतीनें प्रतिबिंबित करीत असत की कीचक म्हणजे 'अरेराव, उन्मत्त लॉर्ड कर्झनच आहे' असें स्पष्ट भासत असे व त्या नाटकांतील वातावरणांत तत्कालीन ब्रिटिश राजसत्ता, जहालपक्ष, मवाळपक्ष व त्यांच्यांतील संघर्ष यांचें उघड सत्यदर्शन घडत असे. या नाटकाच्या प्रभावानें बलाढ्य अशा ब्रिटिश राजसत्तेलाहि हादरा बसविला. खाडिलकरांच्या प्रक्षोभकारक लेखांनी १९०८ सालीं लोकमान्यांना खडतर कारावास घडविला व त्यांची मंडाले येथें रवानगी झाली. या गोष्टीचें शल्यहि खाडिलकरांच्या मनाला सारखें बोचत असावें. १९०९ सालीं त्यांचें 'भाऊबंदकी' नाटक महाराष्ट्र नाटक मंडळीने रंगभूमीवर आणलें. याहि नाटकांत रामशास्त्र्यांच्या रूपानें लोकमान्य टिळक मंडालेचा तुरुंग फोडून 'भाऊबंदकींत' प्रगट झाल्याचा भास ब्रिटिश राजसत्तेला झाला. रामशास्त्र्यांची टिळकांच्या डोक्यांत असणाऱ्या लाल पुणेरी पगडीसारखी पगडी पाहून रामशास्त्री घालत असलेल्या पुणेरी पगडीवर राजसत्तेकडून उघड आक्षेप येऊं लागले. आणि त्याचा अवश्य तोच परिणाम झाला. १९१० सालीं 'कीचकवध' नाटक सरकारनें बंद पाडलें व 'भाऊबंदकी' नाटकावरहि सरकारची अवकृपा होण्याचा दाट संभव दिसूं लागला. अशा वेळीं समोरासमोर उभें राहून या अन्यायाचा प्रतिकार करणें म्हणजे पाषाणाच्या भिंतीवर स्वत:चें डोकें आपटून आपलाच कपाळमोक्ष करून घेण्यासारखें आहे हें विदारक सत्य त्या वेळीं सर्वांनाच कळण्यासारखें होतें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर खाडिलकरांचें पहिलें संगीत नाटक 'मानापमान' १२ मार्च १९११ रोजीं किर्लोस्कर नाटक मंडळीने मुंबई येथे रंगभूमीवर आणलें आणि हिरा उत्तम कोंदणांत बसविला म्हणजे त्याला जी अपूर्व शोभा येते तसें या नाटकाचें झालें. याच वर्षी तात्यासाहेब कोल्हटकरांचें 'प्रेमशोधन' नाटक बसविण्याच्या निमित्तानें खाडिलकरांचा किर्लोस्कर मंडळीशीं निकटचा परिचय झाला. याच निमित्ताने ज्यांच्या स्वर्गीय संगीताने अखिल महाराष्ट्र आजहि वेडा आहे त्या बालगंधर्वांचा आणि काकासाहेबांचा ऋणानुबंध घडून आला. या मणिकांचन योगाने 'मानापमान' नाटक ' न भूतो न भविष्यति ' असें गाजलें—त्यांच्या गद्य नाटकांच्या यशावर या नाटकाच्या प्रायोगिक यशाने मात केली.

एरव्ही कटाक्षाने आपल्या नाटकासंबंधी मुग्धता राखणाऱ्या काकासाहेबांनी 'मानपमान' नाटकाच्या प्रस्तावनेंत आपलें अंतःकरण कांहींसें उघडें केलें आहे. 'गद्य नाटकांत गुरफटून राहिलेल्या मनोवृत्ति मंडळीच्या मृदु, गोड व गुंगविणाऱ्या गायनाने संगीताकडे खेचून नेल्या' असा खुलासा त्यांनी त्या प्रस्तावनेंत केला आहे. सूत्रधाराच्या मुखांतून 'पंचशरें गद्यवरें वश जी झाली। नाट्यकला कवि कृष्णा माळा घाली। ऐशा या समयाला, प्रेमरसें कवि नटला। संगीतीं नवलीला।' असे उद्गार काढले आहेत. व शेवटी नायकाच्या मुखांतून 'नसती भिन्न रस हे, शृंगार राजा नवदल त्याला' असें वदविलें आहे. यावरून ध्येयात्मकतेकडून काकासाहेब रंजनात्मकतेकडे वळले हें स्पष्ट दिसतें. परंतु हा बदल स्वाभाविक नसून परिस्थितिप्राप्त होता. आपलें प्रखर प्रक्षोभकारी तत्वज्ञान आपल्याला पाहिजे तितक्या उत्कटतेने समाजापुढे मांडता येणें ब्रिटिश राजवटीमुळे अशक्य आहे हें विदारक सत्य त्यांना पटलें आणि म्हणून केवळ परिस्थितिप्राप्त अगतिकतेमुळेच प्रथम ते संगीताकडे वळले असें विचारांतीं निश्चित वाटतें. शृंगाररसाची व मृदु मोहक गायनाची ओढ हें केवळ निमित्तमात्र कारण आहे. समाज आणि राष्ट्र यांच्यासाठी अहोरात्र तळमळणारा त्यांचा आत्मा, त्यासाठीं वाटेल तो त्याग व कष्ट सोसण्यास तयार असलेली त्यांची मनोवृत्ति, केवळ पालट म्हणून मृदु गोड संगीताकडे वळली असावी व तेंच एकमात्र कारण खाडिलकरांनी संगीत नाटकाकडे वळण्यास समर्थ ठरलें असेल या गोष्टीवर विश्वास बसत नाही.

केसरी कार्यालयांत सरकारशीं आपलें युद्ध चालवीत असतां आर्थिक प्राप्ति करून घेण्याचा एक मार्ग म्हणून त्यांनी नाट्यरचना केली असें 'विद्यासेवक' मासिकांत त्यांनी लिहिलें असल्याचें ऐकतों. परंतु गद्य नाटकाशीं समरूप नसणारी संगीत नाटकांची रचना त्यांनी आर्थिक लाभासाठी केली हेंहि पटण्यासारखें नाही. तें अशा प्रकारच्या नाट्यरचनेचें एक कारण असूं शकेल. परंतु केवळ आर्थिक लाभासाठी आत्मानुभूत अशा ध्येयाविष्कारी तत्वचिंतक कलेची बैठक सोडून रंजनात्मकतेकडे ते सर्वस्वी वाहवून गेले ही गोष्ट मनाला पटणारी नाही.

'मानापमान' (१९११) 'विद्याहरण' (१९१५) व स्वयंवर (१९१६) या नाटकांत खाडिलकर ध्येयात्मकतेपेक्षा रंजनात्मकतेकडे अधिक वळले यांत संशय नाही. या तिन्ही नाटकांवर वाचक, प्रेक्षक व समीक्षकांनी तत्कालीन परिस्थितीवर आधारित रूपकें बसविलीं. तरी तीं नाटकें त्या नाटकांत असणाऱ्या रंजकतेमुळे, पदांच्या शास्त्रीय व गायकी चालीमुळें, व तीं पदें गाणाऱ्या उत्तम गायक नटांमुळें अधिक गाजलीं. प्रचलित परिस्थितीच्या अनुषंगाने या संगीत नाटकांवर बसविलेली रूपकें 'कीचकवध' किंवा

'श्री गुरुदेव'
मानवसमाजाच्या सर्वांगीण उन्नतीस वाहिलेलें मासिक
श्री गुरुदेव प्रकाशन, गुरुकुंज मोझरी
हिंदी-मराठी विभागात्मक वा. मूल्य रु. ५]
हिंदी विभागात्मक [वा. मूल्य रु. ३

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'भाऊबंदकी' या नाटकांइतकी स्पष्ट व उत्कट खास नाहीत व संगीत नाटकांत शोधून पाहतां सापडणारी रूपकात्मकता त्यांच्या यशाला कारणीभूतहि झाली नाही.

'मानापमान' नाटकाचें पितृत्व कोल्हटकरांच्या चाहत्यांनी कोल्हटकरांच्या 'मूकनायका'कडे दिलेलें आहे. कोल्हटकरांचें 'मूकनायक' नाटक त्यांतील उत्कृष्ट संगीतामुळें त्या काळीं चांगलेंच गाजलें—म्हणूनच गंधर्व नाटक मंडळीच्या स्थापनेच्या वेळीं त्या कंपनीची सुरवात 'मूकनायका'च्या प्रयोगानें झाली. 'मानापमान' नाटकाचें कथानक कोल्हटकरांच्या अद्भुतरम्य नाटकांच्या घडणीचें आहे यांत शंका नाही. कोल्हटकरांचें संगीत 'प्रेमशोधन' बसवीत असतां किर्लोस्कर नाटकमंडळींतील नटांच्या मृदु गोड गायनानें काकासाहेबांना गुंगविलेंहि असेल. परंतु 'मानापमानां'त आढळणारी खाडिलकरांची रचनाचातुरी 'मूकनायकां'त खास नाही. खाडिलकरांचें 'विद्याहरण' नाटक संगीत असलें तरी तें नाटक त्यांच्या कोणत्याहि गद्य नाटकांच्या तुलनेनें एक उत्तम कलाकृति म्हणून कमी प्रतीचें आहे. त्यांत प्रक्षोभकारी, दीप्तिमान राजकीय तत्त्वज्ञान नसलें तरी ती एक परिणामकारी दुःखात्मिका आहे यांत संशय नाही. या नाटकांत विचारवन्त, तत्त्वज्ञ, भावाविष्कारी खाडिलकर खास आहेत. परंतु या त्यांच्या गुणावर त्यांच्या रंजकतेने व विशेषेंकरून संगीतानें उघड मात केली आहे. खाडिलकरांचें 'स्वयंवर' नाटक म्हणजे त्यांच्या उत्कर्षाचें शिखर आहे. या नाटकापासून काकासाहेब खाडिलकर व बालगंधर्व यांच्यांत द्वैतच उरलें नाही. खाडिलकरांचें 'स्वयंवर' म्हणजे त्यांच्या उत्कर्षापकर्षाचा संधिकाल आहे. याच नाटकापासून रसानुकूल नाट्यपरिपोषक संगीतापेक्षा संगीताचे जलसेच नाटकांत सुरू झाले. व संगीत नाट्याला मारक ठरूं लागलें.

या सत्याच्या जाणिवेमुळेच १९१४ सालीं म्हणजे 'मानापमान' नाटकानंतर त्यांनी 'सत्त्वपरीक्षा' नाटक लिहिलें असावें. परंतु ती लेखकाचीच सत्त्वपरीक्षा ठरली. बालगंधर्वांच्या बलवत्तर स्नेहरज्जूंनी खाडिलकरांना इतकें आवळून बांधून ठेवलें की त्यांना गंधर्व नाटक मंडळी व बालगंधर्व यांच्याशिवाय अन्य नाट्यक्षेत्रच दिसूं शकलें नाही. त्यामुळें काकासाहेब खाडिलकर आणि गंधर्व संगीत नाटक मंडळी यांची सायुज्यता घडून आली. गंधर्व नाटक मंडळी या वेळीं ऐश्वर्याच्या शिखरावर होती. १९२० सालीं गंधर्व नाटक मंडळीने खाडिलकरांचें 'द्रौपदी' नाटक रंगभूमीवर आणलें. या नाटकाच्या नेत्रदीपक सजावटीसाठी गंधर्वांनी ७०००० रुपये खर्च केले; परंतु आपल्या प्रणयभावानें मुग्ध शृंगार करणारी भामिनी, देवयानी अथवा रुक्मिणी 'द्रौपदीं'त पाहावयास मिळाली नाही. जनमनाला परिचित अशी महाभारतांतील द्रौपदीहि प्रेक्षकांना आठवली नाही. नाटककारानें योजिलेल्या समस्येला अनुसरून, त्यांच्या अनुज्ञेप्रमाणें बोलणारी, वागणारी द्रौपदीच त्यांना दिसूं लागली. यापुढें १९२७ सालीं 'मेनका', १९३३ सालीं 'सावित्री' व १९३६ सालीं 'त्रिदंडी संन्यास' हीं नाटकें खाडिलकरांनी लिहिलीं परंतु त्यांच्यापैकी एकहि नाटक जनमनाची पकड घेऊ शकलें नाही व रंगभूमीवर यशस्वी होऊ शकलें नाही, आपल्या पूर्वाच्या सूचक वाक्यानें प्रचलित जीवनाचा सजीव आभास निर्माण करण्याचें खाडिलकरांचें कसब या नाटकांत पूर्णत्वानें लोपलेलें दिसत आहे.

'द्रौपदी' नंतरच्या पुढील नाटकांवर महात्मा गांधींच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा उघड पगडा दिसतो. टिळकांच्या मृत्यूनंतर महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानाशीं व राजकीय जीवनाशीं खाडिलकर एकरूप झाले व वयपरत्वें ते आपल्या मूळ नैसर्गिक मनोवृत्तीला अनुसरून कलावन्ताच्या भूमिकेपासून दूर जाऊन तत्त्वचिंतकाच्या भूमिकेशीं अधिक समरस झाले. प्रचलित व्यवहारापेक्षा अध्यात्माकडे ते अधिकाधिक ओढले गेले. त्यामुळे त्यांचीं 'मेनका' 'सावित्री' व 'त्रिदंडी संन्यास' हीं नाटकें पूर्णतः रसहीन, सपाट अशीं उतरलीं. त्यांच्या आधीच्या नाटकांत विद्यमान परिस्थितीशीं समरूप असणारीं रूपकें पौराणिक कथांवर विशेष आघात न करतां, कलात्मकतेनें रसपूर्ण व नाट्यपूर्ण रंगविलीं गेलीं तसें 'द्रौपदी' पासूनच्या कोणत्याहि नाटकाचें झालें नाही. मेनका फेरनाफेर वादाचा नीरस घोळ घालूं लागली, 'सावित्री' नाटकांतील जन्ममृत्यूचें

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तत्वज्ञान अथवा 'त्रिदंडी संन्यासां'तील उपोषणाचें तत्वज्ञान नाट्याला पूरक ठरलें नाही. कारण या नाटकांतील रूपकें मूळ कथानकावर एकापरीनें बळजबरी करूनच बसविल्यासारखीं झालीं. त्यामुळे मूळ कथानक व त्यावरील बसविलेलें रूपक यांचा एकजीव होऊं शकला नाही. याचा व्हावयाचा तोच अनिष्ट परिणाम झाला व हीं नाटकें पूर्णतः अयशस्वी ठरलीं. याला कारण या नाटकांत दुर्दैवानें आढळणारा नाट्यपूर्ण प्रसंगांचा व ठसठशीत आकर्षक व्यक्तिदर्शनाचा अभाव होय. या परिस्थितीमुळे खाडिलकरांनी आपल्या नाट्यकलेला केवळ प्रचाराची बटीक करून सोडली असा सार्थ आक्षेप त्यांच्या नाटकांवर येऊं लागला. रंजनाचें-नाट्यपूर्णतेचें आवरण सोडून नाट्यकला केवळ प्रचाराची बटीक झाली तर त्याचा अपरिहार्य व अटळ परिणाम काय होऊं शकतो याचा विदारक प्रत्यय, मराठींतील एकमेव, अद्वितीय अशा, सार्थतेने नाट्याचार्यत्वाच्या पदवीस पात्र असलेल्या नाटककारासहि घडला.

जनमनाला आकर्षक करूं शकेल, समजूं शकेल, कथानकांतील व्यक्तींच्या भावनांशीं, संघर्षाशीं, सुखदुःखाशीं सामान्य प्रेक्षक समरस होऊं शकेल असे प्रसंग नाटकांत नसले तर चांगल्या नाटककारालाहि अपयश कसें तत्परतेनें धावून येतें हें खाडिलकरांनाहि दिसून आलें. 'द्रौपदी'नंतरच्या खाडिलकरांच्या नाटकांतील तत्वज्ञान एक प्रकारें विदेही स्वरूपाचें, बुद्धिगम्य व सामान्य जनाला आकलन होण्यासारखें नाही. तें कर्मभूमींत उतरावयास आजहि पुष्कळ वेळ लागेल.

सारांश, खाडिलकरांच्या एकंदर नाटकांचा व नाट्यसेवेचा आढावा घेतल्यास त्यांनी नैमित्तिकाचा आश्रय घेऊन समाजापुढे मोठे आदर्श ठेवले, चिरंतन सत्याचा आविष्कार त्यांच्या नाटकांनी केला, नाट्यपूर्ण व प्रभावी व्यक्ति निर्माण केल्या हें खरें आहे. त्यांची कला जीवननिष्ठ व उच्च ध्येयाविष्कारित आहे हेंहि खरें आहे. परंतु त्यांचें हें कार्य त्यांच्या गद्य नाटकांनी ज्या प्रमाणांत यशस्वी रीतीनें व अपूर्वाईनें केलें तितकें यश त्यांच्या संगीत नाटकांना खास प्राप्त होऊं शकलें नाही. किंबहुना त्यांच्या गद्य नाटकांनी त्यांच्या यशोमंदिराचा मार्ग निर्वेध केला तर संगीत नाटकांनी त्यांना उत्तरोत्तर अपकर्षाला कारणीभूत केलें हें विदारक सत्य आहे.

विदर्भ साहित्य संघाचे सभासद व्हा !

सभासदांचे वर्ग

(अ) **उपकर्तेः**—संघास पांच हजार किंवा अधिक रुपये देणारे.

(आ) **आश्रयदातेः**—संघास एक हजार किंवा अधिक रुपये देणारे.

(इ) **सहाय्यकः**—संघास पांचशे किंवा अधिक रुपये देणारे.

(ई) **हितचिंतकः**—संघास अडीचशे किंवा अधिक रुपये देणारे.

वरील (अ) ते (ई) वर्गांच्या सभासदांना आपली रकम देतांना ती विशेष कार्यासाठी नमूद करून देतां येईल. पण अशा रकमेंतून आजीव सभासदत्वाची वर्गणी रु. ५० वगळण्यांत येईल.

(उ) **आजीव सभासदः**--संघास पन्नास किंवा अधिक रुपये देणारे.

(ऊ) **साधारण सभासदः**--संघास वार्षिक तीन रुपये देणारे.

(ए) **प्रतिनिधि सभासदः**—नियमाप्रमाणे संलग्न संस्थांनी नेमलेले प्रतिनिधि.

(ऐ) **सन्मान्य सभासद**—मराठी भाषेची विशेष सेवा अथवा विद्वत्ता या गुणासाठी कोणाहि व्यक्तीस संघाचे सन्मान्य सभासद करून घेण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

वयाचीं २१ वर्षे पूर्ण झालेल्या कोणत्याहि मराठी भाषाप्रेमी व्यक्तीस सभासद होतां येईल. त्याकरिता वर्गणी व आवेदनपत्र भरून केंद्रीय कार्यालयांत पाठवावें. सभासदांना युगवाणीचे अंक विनामूल्य पाठविण्यांत येतात.

अनुक्रमणिका

मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुस्तक परीक्षण 'चंद्रपूरचा इतिहास'

दे. गो. लांडगे

(१) एकेकाळीं-सुमारें ७५ वर्षांपूर्वी-चंद्रपूर म्हटलें की, तेथील लोकांविषयीं नागपूरच्या शिक्षित मंडळीची निराळीच धारणा होती. त्यांच्या मतें चंद्रपूर म्हणजे एक मागासलेलें नगर. त्याचें वैशिष्ट्य म्हणजे तेथील रात्रीं 'घू' 'घू' करणारे घुबड व चिंचेचीं गर्द झाडें आणि त्याच वातावरणानें आक्रान्त असे तेथील अनुत्साही लोक. तसेंच तेथून नागपुरांत येऊन राहिलेल्या मंडळीविषयींहि अशाच वृत्तीचें आवरण आम्हा नागरिक जीवनांत रुळलेल्या त्या काळच्या नागपुरांतील विलासी मंडळीच्या मनावर असे. आम्ही त्यांस एकलकोंडे म्हणूं, तर ते आम्हाला फाजील बहिर्मुख वृत्तीचे म्हणत. परंतु ग्रंथलेखक रा. राजूरकर यांनी दिलेली ऐतिहासिक माहिती वाचली म्हणजे हा समज नाहीसा होतो. श्री. राजूरकर यांनी प्रस्तुत ग्रंथ लिहून, विशेषत: त्यांत आधुनिक इतिहासाचा समावेश करून चंद्रपूरचा कसा कायापालट झाला आहे किंवा होत आहे याचें चित्र डोळ्यांसमोर उभें केलें आहे.

(२) मध्यप्रदेश संशोधन मंडळाचे सदस्य या नात्यानें लेखकाच्या व माझ्या पुष्कळदा भेटीगाठी व पत्रव्यवहार झाला आहे व मी त्यांना वेळोवेळीं चंद्रपूरची जुनी माहिती गोळा करून ती जनतेसमोर मांडण्याविषयी आग्रह करीत असे. सुदैवानें त्यांच्या तरुण व उत्साही मनानें तें कार्य तडीस नेलें, याबद्दल त्यांचें प्रथम अभिनंदन केलें पाहिजे. स्थानिक नागरिकांनीहि त्यांना प्रोत्साहन दिलें व त्यांच्या सुशील स्वभावामुळे त्यांना डॉ. य. खु. देशपांडे यांच्यासारख्या संशोधनकार्यास वाहून घेतलेल्या परिणतप्रज्ञ व वयोवृद्ध संशोधकाचा प्रस्तावनेच्या रूपानें आशीर्वादहि मिळाला आहे. तसेंच लोकनायक बापूजी अणे यांच्या हस्तें ग्रंथप्रकाशन होण्याचेंहि सद्भाग्य ग्रंथकारास लाभलें. ग्रंथास लागणारी माहिती मिळविण्यांत व मुद्रणादि सामग्री जुळवून आणण्यांत ग्रंथकर्त्याला जें यश लाभलें त्यांत लोकाग्रणी दे. भ. श्री. बळवंतराव देशमुख यांचा प्रोत्साहक वरदहस्तहि मुख्यत्वें कारणीभूत झाला आहे. त्याचप्रमाणे चांद्याचे नगराध्यक्ष श्री. मनोहरपंत कोतपल्लीवार व श्री. तु. ना. काटकर प्रभृति धनिक व साहित्यिक यांची सक्रिय सहानुभूति लेखकाच्या वाट्यास आली असून त्याबद्दल त्यानें नितान्त कृतज्ञताबुद्धि व्यक्त केली आहे, हें सांगणें नको.

(३) चंद्रपूर हें प्राचीन विद्येचें, विशेषत: वेदपाठी अनुष्ठानी व आचारसंपन्न ब्राह्मणांचें व सावकारी आणि व्यापारी वृत्तीच्या धनिकांचें माहेरघर होय. मध्यंतरीं मराठ्यांच्या राज्यभ्रंशतेमुळे व १८१७-१८ त पेशवे व आपासाहेब भोसले यांच्याशीं इंग्रजांचा जो संघर्ष झाला त्यामुळे व त्यानंतर १८५७-५८ च्या संग्रामाच्या आचेमुळे जरी या नगराला ग्लानी व म्लानता आली, तरी सावर घरून या नगराच्या परिसरांतील चिमूर वरोडा इत्यादि गावांतील कार्यकर्त्यांनी भारतीय पुनर्जीवनाच्या पवित्र गंगेला अनेक देशभक्तांचें पर्याप्त मात्रेंत दान दिलें आहे. या सर्वांवर एका सुपुत्रानें तर कळसच चढविला. गोवाप्रकरणीं ज्या थोरातानें देशाच्या वेदीवर आपले प्राण अर्पण केले, त्याची थोरवी काय वर्णावी ! पवाडे गावयाचेच, तर अशांचेच गाण्यांत सार्थक आहे. अशा रीतीनें श्री. राजूरकर यांनी ज्या अजून इतिहासजमा झाल्या नाहीत अशा नूतन स्मृतीहि शेवटचीं १२५ पृष्ठें खर्च करून ग्रन्थनिविष्ट केल्या हें एक प्रकारें कांहीसें कष्टसाध्य कार्यहि कुशलतेनें पार पाडलें आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(४) इतिहास म्हटला की, मग तो एखाद्या नगराचा असो वा प्रांताचा असो, त्याची पूर्वपरंपरा किंवा पार्श्वभूमि वाचकांपुढे ठेवलीच पाहिजे. त्याशिवाय त्याच्या निमेषोन्मेषाच्या कार्यकारणभावाची किंवा जन्यजनकभावाची संगति लागणें शक्य नाही. या दृष्टीने आर्यांची वसाहत चंद्रपूरभागांत केव्हा व कशी झाली, चंद्रपूरचें मूळ नांव कोणतें व त्याचीं रूपान्तरें कशीं झालीं, तेथे किंवा तेथील परिसरांत हैहय, पांडव-वंशीय, सातवाहन, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकूट, नाग-वंशीय नाना जातीचे शासक हे सर्व उपराज्यकर्ते किंवा अधिराज्यकर्ते या नात्याने कसे व किती नांदले यांचें धावतें समालोचन करून, शेवटीं गोंडांची सत्ता व मराठ्यांची सत्ता या दोन सत्तांचें आवश्यक तेवढें वर्णन केल्यावर त्यांत साधुसंत, पंडित, राजकारणी व इतर कर्तबगार पुरुष, देव व देवायतनें इत्यादींसारख्या सांस्कृतिक इतिहासाचीहि रंगपेरणी केल्यामुळे हा सुमारें ४०० पानांचा अनेक प्राचीन व अर्वाचीन स्थापत्यनिर्मितींच्या छायाचित्रांनी सजविलेला ग्रंथ वाचनीय व आकर्षक झाला आहे.

(५) आता आपण या ग्रंथांत वर्णिलेल्या गोष्टीं-कडे वळूं. पहिली गोष्ट म्हणजे दण्डकारण्याचें आर्यी-करण. हा विषय जरा खोल आहे. याचा निर्णय केवळ एक दोन पुराणांतून उद्धृत केलेल्या अल्प सामग्रीवर लागण्यासारखा नाही. विदर्भ देश कशाला म्हणावें, तेथे आर्यांची वस्ती केव्हापासून होती, दण्डकारण्याची व्याख्या काय, विदर्भ व महाराष्ट्र यांचा व्याप्यव्यापक संबंध किती व कसा वगैरे प्रश्न ग्रंथकर्त्याने विशेष चर्चिले नाहीत हें एक प्रकारें बरेंच केलें. आन्ध्रांचें राज्य केव्हां व किती होतें, आन्ध्रभृत्य सातवाहन यांचा काळ व सत्ता, कलिंगाधिपति खारवेलनें या प्रदेशांत कोठपावेतों प्रवेश केला, गुप्त–वाकाटक आणि भारशिव यांचीं क्षेत्रें कोणतीं, यांचें धावतें वर्णन करण्यांतच मौज होती. तरी वाकाटकांच्या दानपत्रांतील ग्राम-ग्रामान्तरांचा छडा लावण्याचा लेखकाने प्रयत्न केला आहे व तो प्राचीन इतिहासाच्या तज्ज्ञांनी तपासून पाहण्यासारखा आहे. लेखकाने पूर्वेतिहास देतांना गॅझेटिअरचा व मेजर लुसी स्मिथच्या बंदोबस्ताच्या वृत्तान्ताचाहि पर्याप्त उपयोग केला आहे. तथापि त्यांनी स्वतःची नवीन माहितीहि दिली आहे. किंब-हुना लेखकाच्या हातांत जीं मूळ साधनें पडलीं किंवा स्वतःच्या डोळ्यांनी त्यांनी निरीक्षिलीं त्यांचीहि भर साक्षेपाने घातली आहे. असें करण्याच्या ओघांत मूळ गतिमान ऐतिहासिक कथानकाचें सूत्र मध्येच तुटून मूळ पदावर येण्यास वाचकास कसा ताण पडत असेल याचेंहि भान कधी कधी लेखकास राहिल्याचें दिसत नाही. मध्येच निळकंठराव ढुमे यांची दीर्घ कथा, मध्येच भोसल्यांची वंशावळ, गोविंदस्वामी, त्र्यंबकभट पंचभाई व देवाजीपंत चोरघडे, सगणाजी खटी तुकुमदास, वैद्य रुद्रपवार व त्यांच्या त्यांच्या वंशावळी व सनदा देऊन ग्रंथाला एकप्रकारचा विस्क-ळितपणा आलेला दिसतो. चंद्रपूरच्या व्यापारी महत्त्वाला ईषत्स्पर्श होतो न होतो तोंच एक दस्तक (ताकीदपत्र नव्हे. दस्तक हें पासपोर्टसारखें असे) देण्यांत येतें. तर लगेच व्यंकोजी भोसल्यांचा स्वभाव-व योग्यता जोखण्याचा प्रसंग येतो. (पृ. २३०–२३३) पृ. १७८ वर आद्य रघूजीनंतरची वंशावळ मध्येच देण्याचें विशेष प्रयोजन नव्हतें. यापेक्षा जर चंद्रपूर व इतर ठिकाणचीं राजकीय घराणीं व वीरपुरुष, वैदिक, पंडित, साधुसंत, देवस्थानें व मंदिरें यांची कालनिरपेक्ष वर्गवारी करून ग्रंथाची रचना केली असती तर त्या योगाने त्याच्या वाचनीयतेंत अधिक भर पडली असती. ग्रंथकर्त्याने कालानुसारी व साधार माहिती देण्याच्या भरास पडून कधी कधी कथासूत्राच्या दृष्टीने कमी महत्त्वाच्या विषयास अधिक पानें खर्च केलीं आहेत. नाही म्हटल्यास १८५४ ते १९२० मधील संत मंडळी एकाच प्रकरणांत आणली आहे व हीच पद्धति श्रेय-स्कर वाटते. (पृ. २९८–३१३).

(६) आता या ग्रंथांतील विधानांसंबंधी थोडें पाहूं. पृष्ठ ५ व २५ वर चंद्रपूर हें इंदुपूरचें प्राकृत रूप होय असें म्हटलें आहे. राजशेखराच्या बालरामा-यणांतील राम सीतेला म्हणतो ' सोयं सुभ्रु पुरो विदर्भ-विषया सारस्वतीजमन्भूः '. यावर सीतादेवी उत्तरते, ' जहि उप्पण्णा मे पिदामह समुरस्य घरिणी इंदुमदी ' येथे सीतेने इंदूचें ' चंद्र ' हें प्राकृतीकरण केलें नाही

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

इंदु व चंद्र हे दोन्ही शब्द संस्कृतच आहेत. एका १२५ वर्षांपूर्वीच्या हळद्यांच्या पत्रांत चंद्रपूरचें शशिपूर हें नांव लिहिलें आहे व नागपूरला फणींद्रपूर म्हटल्याचें तर कित्येकांना स्मरत असेल. चंद्रपूरसाठी चंद्रहास्याची कथा ओढून घेण्याचें कारण नाही. फार काय पूर्वी मध्यप्रदेशांत असलेल्या संबलपूर जिल्ह्यांतील एका परगण्याच्या गावाचें नांवहि चंद्रपूर आहे (सी. पी. गॅझेट १८७०). चांदूरहि तसेंच असावें.

(७) ग्रंथकारानें 'गोंडवण' हा 'ण'कारान्त शब्द बुद्धिपुरःसर वापरला आहे (पहा पृ. ४६–४७). वस्तुतः गोंडवन हा शब्दप्रयोग प्रथम ऐने अकबरींत सापडतो. त्यावेळीं अबुल फजलला त्या प्रांतांत गोंडांचींच राज्यें दिसलीं व संख्येनेहि गोंड अधिक दिसले तेव्हा त्याने गोंडवन म्हणणें साहजिक आहे. अलिकडचे लेखक श्री. रसेल व डॉ. हिरालाल हेहि पूर्वीच्या मध्यप्रदेशाच्या उत्तर विभागांत गोंड शेकडा ५० व बस्तरसारख्या ठिकाणीं ३ असल्याचें म्हणतात. इतर ठिकाणींहि गोंड, भिल्ल, कोरकू यांची वस्ति बरीच होती. परंतु त्या भागाला गोंडवन हें सामान्य नाम नसून विशेषनामच आहे व याला या प्रांतांतील 'अष्टादशाटवीराज्य' या संज्ञेचा आधारहि आहे. 'वण' हा व्रण या शब्दाचा अपभ्रंश होय; परंतु तो येथे उपपन्न नाही. गोंडांनी 'वण' म्हणजे जखम, या भूमीस केली नाही उलट त्यांनी कर्षण करून म्हणजे तिला कसून तींतून जीवनाची सामग्री काढली.

(८) या ग्रंथांत कांही माहिती अनवधानानें चुकीची आली आहे. उदाहरणार्थ, बाळकृष्णभट हे रघुनाथभट असण्याबद्दलचा तर्क चुकीचा आहे (पृ. १३७). नागपुरांतील सगदेवाचा वंश त्यांनी दिलेल्या शेवटल्या पुरुषांनी संपला नाही (पृ. १६८). नीळकंठराव ढुमे हे आद्य ग्रंथकारहि नव्हेत (पहा पृ. २४२). जेंन्किन्सच्या कारकिर्दीत औरंगाबादकर व माधवराव चिटणवीस यांनी बखरी लिहिल्या आहेत. तशीच एक बखर दिघ्यांची नागपूरकर गोंड राजांचीहि आहे. या तिन्ही माझ्याजवळ किंवा संशोधन मंडळांत आहेत. त्यांच्याहि आधीं वैजनाथ शर्मा यांनी मराठीचें व्याकरण लिहिलें असून तें कलकत्त्याच्या सरकारी ग्रंथालयांत आहे. १०० ते १२५ वर्षांपूर्वी गंगाधरशास्त्री मंग्रूळकर यांनी १७ ग्रंथ लिहिले आहेत. त्यानंतर कै. वा. दा. ओक व कै. ह. म. पंडित यांनीहि बरेंच लिखाण केलें आहे. याशिवाय, कांही संतवाङ्मयहि आहे. पृ. २५८ वर एक मुद्रण दोष दिसतो. परसाजी भोसल्यांचाच मुलगा (बाजीराव गुजरे) परसाजीच्या राणीने दत्तक घेतल्याचें छापलें आहे. मक्षिकानिवारणार्थ भोजनाचे वेळीं १९०९ च्या पुष्कळ आधीपासून धर्माभटांचें नांव घेतांना मी पाहिलें आहे.

(९) कांही व्यक्तींच्या वर्णनाचा अभाव जाणवतो. उदाहरणार्थ, म. म. केशवराव ताम्हण, सिटीस्कूलचे हेडमास्तर बाळाजी विठ्ठल आवळे, सोमलवार कुटुंब, सिताराम सांबशिव वाराणसीवार, नागपूर म्युनिसिपालिटीचे भुतपूर्व अत्यंत सात्विक असे सेक्रेटरी, कै. नागोराव पोषट्टी, विद्यमान श्री. दाजीशास्त्री चांदेकर, कै. बापूजी ताम्हण हे लो. ना. अणे व श्री. बळवंतराव देशमुख यांचे पूज्य गुरु असून त्यांच्या दर्शनास हे दोघेहि नेहमी जात असत. त्यांना एका ख्रिस्ती माजी विद्यार्थ्यानें 'That doyen of Sanskrit Scholarsbip' व "He carried about him an air of old-world dignity" असें म्हटलें आहे. त्याचप्रमाणे मागील पिढींतील कै. देवराव पाटील, कै. पुरुषोत्तमराव पंडे व विद्यमान श्री. रा. कृ. पाटील या वरोडयाच्या राष्ट्रभक्तांविषयी विशेष गौरवान्वित असे उल्लेख हवे होते. श्री. कन्नमवार यांचें जें गुणवर्णन आलें आहे तें त्यांच्या कर्तृत्वशक्तीस साजेसें असेंच आहे.

(१०) कांही ठिकाणीं सनदांचे वाचन थोडेसें चुकलेलें दिसतें. उदाहरणार्थ पृ. १६९ वरील सनदेंत 'लाजिमा' ऐवजी 'कदीम' हें हवें व पृ. २२१ वर विनतपशील ऐवजी बि-(ब) तपसील हवें. 'संगामावर' हा तर मुद्रणदोष आहे. पृ. ३०३ वर 'जाणी' ऐवजी 'दाणी' व 'कोठीकर' ऐवजी 'काठीकर' हवें. फूटनोट व हॉटेल हे शब्द मुळांत वापरण्याची जरुरी नाही. पृ. १२५ वर रामशहाला भूपतिराय असा मायना होता असें म्हटलें आहे. ती विशिष्ट पदवी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नव्हे. महीपति किंवा भूपतिराय हे मायने नागपूरकर गोंडराजांच्या नांवामागेहि असत.

(११) राणी हिराबाई हिला पृ. १०० वर 'चंद्रपूरची अहिल्याबाई' असें म्हटलें आहे. कोठे, पुण्यश्लोका दानशूर अहिल्याबाई व कोठे हिराई की जिने मुलीला 'भर्तृविप्रकृताऽपि रोषणतया मा स्म प्रतीपं गमः' असा उपदेश करण्याऐवजी नवऱ्याच्या हाताने जावयाचा खून करविला. उलट अहल्याबाईची मुलगी मुक्ताबाई हिने याहिपूर्वी दुःखी झालेल्या प्रेमळ मातेच्या अत्याग्रहास न जुमानतां पतीवरोबर सहगमन केलें. राणी हिराबाईने देवीचें देऊळ बांधलें परंतु त्यावर जावयाच्या शिराची दगडी प्रतिकृति ठेऊन आपल्या तामसिक सूडबुद्धीचेंच उलट प्रदर्शन केलें. त्या मानानें तिचा दत्तक मुलगा रामशहा कितीतरी थोर पुरुष !

(१२) लोक. बापूजी अणे यांनी 'जय ठाकरी' ऐवजी 'जम ठाकरी' असा शब्दप्रयोग पुरस्कारांत सुचविला आहे. त्यांचेंच म्हणणें योग्य दिसतें. ग्रंथकर्त्याने गोवळकोंड्याच्या लागोपाठ दोन सुलतानांच्या आक्रमणांचें वर्णन केलें आहे. फिरिश्ताप्रमाणे पहिलें फिरोजशहाचें आक्रमण खेडल्याच्या नरसिंगरायने वऱ्हाडवर जी चाल केली त्याविरुद्ध झालें. (रा. ब. सरदेसाई यांनी रियासतींत म्हटल्याप्रमाणे केरळच्या राजाची नव्हे) दुसरें, फिरोजशहाचा मुलगा अहमदशहा याने १० वर्षांनी म्हणजे १४२५ सालीं माहुरच्या बंडखोर जमीनदारावर केले व तो शरण आल्यावर त्याला जीवनदानाचें आश्वासन दिल्यावरहि त्याच्या ५–६ हजार अनुयायांसह त्याला ठार मारलें. यानंतर "The Sultan possssed himself of a diamond mine of Gohnd wareh where he raised many temples of idols, erecting mosques on their site appropriated to each some tracts of land to maintain darveshas & supply lamps & oil for divine service (Scott's Firista vol I. p. 103) तेव्हा लोकनायकांचाच शब्दप्रयोग बरोबर दिसतो.

(१३) १८५७ च्या प्रकोपाचें वर्णन करीत असतां लेखकाने बाबूराव या मोळमपल्लीच्या जमीदाराला अहेरीच्या लक्ष्मीबाईनें पकडून दिल्याचें दुष्कृत्य केल्याचें उल्लेखिलें आहे. तिनें नंतर त्याची जप्त झालेली गावेंहि ब्रिटिशांपासून स्वीकारलीं. परंतु याबाबत नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या मध्यप्रदेशांतील स्वातंत्र्याच्या लढयाच्या इतिहासांत याबाबत असें म्हटलें आहे, "Laxmibai was threatened that if she failed to apprehend Bopoorao & Venkatrao she would be prosecuted for harbouring a rebel & assisting the rebels & her jamindari would be forfeited" यावरून तथाकथित अनेक विश्वासघाताच्या प्रकरणांवर विदारक प्रकाश पडणें शक्य आहे. बाबूराव फाशी गेला असतां फाशीची तात चारदा तुटल्यामुळे शेवटीं त्यास चुन्यांत भाजलें. अशीच तांत चारदा तुटल्याचें नागपूरच्या काद्रअली विषयींहि सांगण्यांत येतें. जनश्रुतीच त्या. नक्की सांगता येत नाही.

(१४) या ग्रंथांत दिलेल्या प्राचीन ऐतिहासिक अधिसत्तांविषयीं लिहिण्यासारखें आहे. कारण ग्रंथकारानें दिलेले सर्वच पुरावे सारख्या तोलाचे नाहीत. बंर्याची माहिती तर गॅझेटिअरवरच आधारली आहे. कै. डॉ. केतकर यांच्या प्राचीन महाराष्ट्र या ग्रंथाचा व एपिग्राफिआ इंडिकाचाहि उपयोग लेखकाने केला आहे. अद्यावत तद्विषयक लेखक म. म. मिराशी यांचाहि आधार घेतला आहे. श्री. काकडे यांच्या संशोधनाचा आश्रय घेऊन स्वतःच्याहि प्रयत्नाची भर लेखकाने घातली हें त्यास भूषणावह होय. आधार निर्दिष्ट केल्याबद्दल कोणीहि त्यास धन्यवादच देईल. यानंतर माना व गोंडराजांचीहि अद्यावत् उपयुक्त व संशोधनात्मक माहिती दिली आहे. 'दाण्डक्य भोज' हा प्रयोग जो चाणक्याने इन्द्रियविजय या प्रकरणांत वापरला आहे त्याचा ऐक्ष्वाकूशीं समन्वय करणें शक्य आहे. कित्येक बाबतींत लेखकाने नवीन प्रकाश पाडला आहे. उदाहरणार्थ, भोसल्यांचे दीन पंडित, गंगासिंग किल्लेदार, लिंगोपंत दीक्षित सुबाणी बापू इ० विषयीं बरीच पूरक माहिती या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रंथांत सापडते. एक बाजू मात्र जरा मनास खटकते व ती म्हणजे व्यापारी व औद्योगिक बाजू. हिचा परामर्ष चंद्रपूर सारख्या वन्य व खनिज संपत्तीने रसरसलेल्या भागाच्या वर्णनांत अत्यावश्यक होता. एकनाथाने देखील वरोड्याच्या हिऱ्यांच्या खाणींचा उल्लेख केला आहे. तेथे चिनी मातीच्या उपकरणांच्या व इतर जंगली वस्तूंच्या उत्पादनाला केवढें तरी क्षेत्र आहे. एके काळीं तेथील तलम कापड मुंबईकडे व त्याच मार्गाने अरेबियाच्या पेठेपर्यंत जात असे असें मेजर स्मिथ आपल्या वृत्तांतांत म्हणतो. (१८७०) त्याच-प्रमाणे लोकसंख्येचे तुलनात्मक आकडे, ख्रिस्तीकरण, चंद्रपुरी बोलीचे कांही वाक्प्रयोग व नमुनेहि देण्यासारखे होते.

(१५) असो. एकंदरीत ग्रंथ पाहतां तो अत्यंत वाचनीय झाला असून तो सर्वांगपूर्ण करण्याचा ग्रंथ-कर्त्याचा प्रयत्न अभिनंदनीय आहे. तरुण वयांत आपला पोटापाण्याचा व विश्वविद्यालयीन परीक्षेचा व्याप संभाळून फारशी संदर्भसामग्री हाताशीं नसता लेख-काने जो एवढा ग्रंथ लिहिण्याचा प्रयत्न केला आहे तो स्तुतीस पात्र आहे. वाचकांनी, विशेषत: ग्रंथसंग्र-हालयांनी त्यांच्या श्रमाचें चीज केलें पाहिजे. ग्रंथाच्या मानाने ३ रु. मूल्य अगदी अल्प आहे व याचें श्रेय नाग-पूरचे उदार धनिक श्री. ल. श्री. देशमुख व इतर आश्रयदाते यांस देणें योग्य होईल.

चंद्रपूरचा इतिहास—ले० अ. ज. राजूरकर, प्रकाशक, शारदा प्रकाशन चांदा, पृ. ३९०, मूल्य ३ रु

पत्रव्यवहार

सन्मान्य संपादक 'युगवाणी' यांस,

सादर नमस्कार वि. वि.

युगवाणीचा ताजा दीपावली विशेषांक १९५६ हा पाहून मला फार आनंद झाला. मुखपृष्ठावरील चित्र मला फारच हृदयंगम वाटलें व त्यावरून श्री. देशमुखसाहेबांना उद्देशून मी एक कविता पाठविली आहे. आपणांस आवडली तर युगवाणींत यावी अशी विनंती आहे. पत्रोत्तरीं पोंच व अभिप्राय समजावा.

युगवाणीचें व आपल्या संघाचें सर्व कार्य पाहून मलाच काय, सर्वांना संतोष वाटेल. आपणांस मी सुयश चिंतितों.

मला त्या भागांत येऊन आपला परिचय करून घ्यावयाचा आहे. केव्हा योग येतो पहात आहे.

या दीपावली अंकांत प्रा. गो. श्री. बनहट्टी यांचा गीतगोविंदावर लेख आहे. त्यांतील पहिल्याच परिच्छेदांत अष्टपद्यांसंबंधी मजकूर आहे. बहुतेक अष्टपद्यांत नवव्या कडव्यांत कविनाम आहे असें त्यांचें विधान मला बरोबर वाटत नाही. गीतगोविंदांत २४ अष्टपद्य आहेत. त्यांपैकी २१ अष्टपद्यांत तरी ८ कडवीं असून शेवटच्या कडव्यांत कविनाम निर्दिष्ट केलें आहे. मात्र १ ल्या अष्टपदींत ११ कडवीं, २ ऱ्या अष्टपदींत ९ व १० व्या अष्टपदींत ५ कडवीं, अशीं आढळतात. माझ्या 'सुश्लोक गोविंद'च्या प्रस्तावनेंत मी १९३४ च्या आवृत्तींत व पुन: १९५४ च्या आवृत्तींत माहितीपूर्ण प्रस्तावना दिली आहे. प्रा. बनहट्टींच्या अवलोकनांत सुश्लोक गोविंद नसेलहि. असो. युगवाणींत माझा आशय दिल्यास वाचकांना उपयोगी होईल. कळावें लोभ असावा, ही वि.

आपला

कोल्हापूर
७-११-५६

रामचंद्र चिंतामण श्रीखंडे
'सुश्लोक मानस'कार

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'युगवाणी' दीपावली (१९५६ च्या) अंकावरील कोनशिला समारंभास बसल्यावेळचें

श्री. चिंतामणराव देशमुख यांचें चित्र पाहून

मनोहर असें तुझें बघितलें सख्या ! चित्र रे;
  अतीव मज जाहला हृदयिं हर्ष, सांगूं खरें ।
विघ्नभंजन तुष्टले शुभ करीं तुझ्या स्यापितां
  शिला उचित मंदिरा, गमसि तूंचि संगोपिता ॥१॥

बघोनि तव बैसली मधुरमूर्ति पाटावरी
  शुचिस्मित मुखांबुजा अतुल देत शोभा वरी ।
निवेदि रसिकत्व ती सरल नासिका मोहवी
  मला तरि गमे अशी सहृदया द्युति-श्री हवी ॥२॥

सुमंगल शिला तुंवां सुभग रम्यहर्म्यास्तव
  निवेशिलि, करीति ते बुध तुझ्या गुणांचा स्तव ।
विलोकिति सुधन्य की मधुर योग हा दुर्लभ
  मलाहि अति धन्यता गमलि पाहुनी हें शुभ ॥३॥

हें रंगमंदिर विशेषचि शोभणार
  की त्यास सुंदर तुझा कर लोभणार ।
चिंतामणीच मिळतां सहजीं सुकार्या
  आश्चर्य कां न गमणार समस्त आर्यां ! ॥४॥

युगवाणी प्रती आणी शोभा हें चित्र सुंदर ।
  साहित्य संघ वैदर्भी रीति श्री रंगमंदिर ॥५॥

पूजनाच्या समारंभीं वाहूं कुंकुम अक्षता ।
  फुलें उत्तम गंधाढ्य श्रीमूर्ती दावि दक्षता ॥६॥

भालप्रदेश सुविशाल विशेष रम्य
  तें शोभतें स्मित जया दुसरें न साम्य ।
बुद्धिप्रकर्ष चतुराइ नितान्त पुण्य
  सारेच सद्‌गुण तुझे गमती अगण्य ! ॥७॥

हे कोण बैसवित कोनशिला विशाला
  वैदर्भरीति पुतळा सुचला यशाला ।
राहील कीर्ति तव मूर्ति अनन्तरी तीं
  सर्वान्तरी पुसटणार कधींच ना ती ! ॥८॥

श्री. देशमुखांच्या कोनशिला-स्थापन चित्रा-वरून केलेल्या डॉ. रा. चिं. श्रीखंडे यांचे कवितेस

श्री. चिंतामणराव देशमुख यांचे काव्यमय उत्तरोद्गार

१२ औरंगजेब रोड
नवी दिल्ली
१९-११-५६

श्री. रा. चिं. श्रीखंडे यांस सस्नेहादर न.

पत्र पोचलें. फार बरें वाटलें. आपल्या कविता फारच चांगल्या झाल्या आहेत.

तुझा स्तव मला मनीं कविवरा खरा मोद दे
अवास्तव कसें बरें समजुं मी कवी जें वदे
असेल जरि अल्पशी उमटली प्रसन्न छवी
तिला स्वजनबान्धवप्रणय दे अनल्पाच्छवी

विदर्भमनि जागते अजुनिही पुरासंस्कृति
सुनाट्य नटवाटिका फुलुनियां करी स्या हवी
दिसोन जंव लोचना रुचिर ये असा सोहळा
कसा रसिक आननीं विकचरम्य ना हो कळा २

तें रंगमंदिर नव्हे, नव सत्कलांचा
  रम्याद्‌भुत प्रचुर दर्पण जीवनाचा
साचा तयांत मिळतो नव कल्पनांचा
  साकार संच [illegible] रेखित भावनांचा ३

रंगमंच नव हा जनतेला
  पंचशील समर्थाच ठरेला
बंधनारहित रंजन देवो
  शुद्धमानस समंजस ठेवो ४

आपला
चिं. द्वा. देशमुख.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक समिति

सौ. मालतीबाई बेडेकर ह्यांचीं व्याख्यानें

महाराष्ट्राच्या सुप्रसिद्ध कादंबरीकार सौ. मालतीबाई बेडेकर यांनी विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक समितीच्या वतीनें दि. १० व ११ नोव्हेंबर रोजीं दोन व्याख्यानें दिलीं. व्याख्यानांची व्यवस्था हिंदी साहित्य संमेलनाच्या मोर भवनांत करण्यांत आली असून तिकिटें लाविलीं असतांहि असंख्य सुविद्य स्त्री–पुरुषांनी या व्याख्यानांचा लाभ घेतला.

शनिवार, दि. ११ रोजीं 'कादंबरीच्या निर्मितीची प्रक्रिया' या विषयावर सौ. बेडेकर यांचें पहिलें भाषण झालें. 'कादंबरी ही लेखकाच्या व्यक्तित्वाचा आविष्कार असल्यामुळे प्रत्येक कादंबरीचें तंत्र हें लेखकसापेक्ष असतें आणि त्यामुळेच कादंबरीच्या निर्मितीची सर्वसामान्य प्रक्रिया सांगणें अडचणीचें आहे' असें विधान करून त्या पुढे म्हणाल्या, 'प्रत्येक मनुष्य स्वतःबरोबर एक जीवनशक्ति घेऊन येतो. ती जीवनशक्ति मनुष्याला पूर्णतेकडे ओढते. ही पूर्णता साध्य करण्यासाठी मनुष्य अनेक मार्गांचा अवलंब करतो. कादंबरीलेखन हाहि या अनेक मार्गांपैकीच एक मार्ग आहे. व ज्याला ही पूर्णता कादंबरीचें लेखन केल्यानेंच साध्य होऊं शकेल असें वाटतें, तोच कादंबरीकार होऊं शकतो.'

'जीवनस्पर्श नसलेली शुद्ध वैचारिकता, भावनात्मकता, जीवनात्मक वा जीवनस्पर्शी वैचारिकता व भावनात्मक वैचारिकता या चार रीतींनी लेखनाचा अवतार होतो' असें सांगतांना या चारहि रीतींचें सोदाहरण विवेचन करून त्यांनी तीव्र संवेदना हें लेखनांचें कारण होय हें स्पष्ट केलें. घटना या कादंबरीचा प्राण असून दृश्य परिणामी व अदृश्य परिणामी अशीं त्यांचीं स्वरूपें असल्याचें सांगून त्या म्हणाल्या, 'कादंबरीची निर्मिति ही सलग नसते. सुप्त मन मानसिक कोलाहलांत चाचपडतं, व्याकूळ होतं. अशा कोलाहलपूर्ण मनोवस्थेंत मनुष्य स्वतःला विसरतो; पण त्याची जाणीव मात्र कायम असते. त्या जाणीवपूर्ण कोलाहलांत मनांत निर्माण होणारीं पात्रं जिवंत होतात, भोंवती वावरतात...डिवचतात! भाषाहि त्या समाधित अवस्थेंतूनच स्फुरते. पण या भारावलेल्या मनोवस्थेंतहि मनुष्य मनांत त्या सर्व गोष्टींची व्यवस्था, सुसंगति निर्माण करतो. कादंबरीचा गर्भ कोलाहलाच्या वृत्तींत जन्माला येतो. या सर्व लेखनांतून लेखकाचं व्यक्तिमत्व प्रगट होतं. मनःपिंडानुसार लेखन बदलतं...आकार घेतं. लेखकाचे संस्कार घेऊन आलेल्या कादंबऱ्या म्हणूनच जिवंत वाटतात. अन्यांच्या कपाळीं निर्जीवतेचा शिक्का मारला जातो!'

'कादंबरीच्या निर्मितीच्या वेळीं तोल संभाळला पाहिजे व हा तोल भावनात्मक वैचारिकतेमध्येच संभाळला जातो. पात्रांबरोबर वाचकांना वाहून नेणें हेंच कादंबरीचें सामर्थ्य असून वैचारिकतेची हुकूमशाही कादंबरीवर झाली तर त्या सरस होणार नाहीत. यासाठी प्रथम तटस्थपणानें जीवन समजून घेतलें पाहिजे व त्यासाठी प्रवासापेक्षाहि तीव्र संवेदना अत्यंत महत्वाची आहे' अशा आशयाचे विचार व्यक्त करून त्यांनी आपलें भाषण संपविलें.

रविवार, दि. ११ रोजीं 'आपलें मराठी बालवाङ्मय' या विषयावरील आपल्या दुसऱ्या व्याख्यानांत सन् १९३७ पासून १९५६ पर्यंतच्या बालवाङ्मयाचा तौलनिक परामर्श घेतला व स्वतंत्र भारतांतील बालवाङ्मयाच्या निर्मितीकडे वळण्यापूर्वी केवळ मनोरंजन हेंच उद्दिष्ट ठेवणें योग्य नाही. बालांच्या मानसिक विकासाचीहि दृष्टि आपण बाळगली पाहिजे असें त्यांनी सांगितलें.

संघाध्यक्ष बाळासाहेब ढवळे ह्यांनी दोन्ही भाषणांचा यथोचित समारोप केला व श्रोत्यांचें सहकार्याबद्दल आभार मानले.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अभिप्राय

'युगवाणी'च्या भेटीस अनेक नियतकालिकांचे दीपावलि विशेषांक आले आहेत. त्यांचे आम्ही ऋणी आहोंत. सर्वांचा आढावा घेतां त्यांतील बहुतांश भाग ललित साहित्यानेच व्यापला आहे असें दिसून येतें. साहित्य हें जर जीवनाचें प्रतिबिंब असेल तर आमच्या जीवनांत गांभीर्यापेक्षा लालित्याचाच भाग अतिरिक्त आहे असा निष्कर्ष निघतो. आलेल्या विशेषांकांची नामावलि त्यांतील वैशिष्ट्यांसह थोडक्यांत पुढे देत आहें.--संपादक

(१) **पुरुषार्थः**-सर्वच लेख वाचनीय आहेत. ललित कथांचाहि दर्जा उच्च आहे.

(२) **उद्यम**-हा अंक त्यांच्या नेहमीच्या परंपरेस साजेसाच निघाला आहे. सर्वच लेख माहितीपूर्ण व उपयुक्त आहेत.

(३) **प्रतिष्ठानः**-यांतील लेख मराठवाड्याचा परिचय करून देणारे आहेत. 'शके ८९३ चा राष्ट्रकूट ताम्रपट' हा संशोधनपर निबंध वाचनीय आहे. ललित साहित्यहि बरें आहे.

(४) **मुलांचें मासिक**-लहान मुलांचेंच मनोरंजन करणारें व त्याचबरोबर माहिती पुरविणारें साहित्य यांत आहे.

(५) **श्रीगुरुदेव**-हिंदी व मराठी या दोनहि भाषांत अंक काढलेला आहे. मराठी विभागांतील लेख विशेष चांगले आहेत. कविताहि बऱ्या आहेत. महत्त्वपूर्ण लेखांच्या मानाने कवितांची संख्या जास्त आहे.

(६) **मनोहर**-मनोहर मासिकाचा नव्या स्वरूपांतील हा पहिलाच अंक आहे. यांतील लेख, परिचय वगैरे पूर्वीच्या परंपरेस शोभसेच आहेत. अंतरंग व नवीन बहिरंग दोन्हीहि 'मनोहर' आहेत.

(७) **एकता**-संपूर्ण अंक वाचनीय आहे. 'हिंदुधर्म आणि बौद्धपंथ' हा लेख विशेष उल्लेखनीय आहे.

(८) **लोकमत**-'लोकमत' साप्ताहिकाचा दिवाळी विशेषांक. यांतील श्री. श्री. म. माटे यांचा 'मृतकाळाच्या पारंब्या' हा लेख फार चांगला आहे.

(९) **धनुर्धारी**-अंकाची अर्ध्यापेक्षा जास्त पृष्ठसंख्या ललित साहित्य व भविष्य यांनी व्यापलेली आहे. त्या मानाने अभ्यसनीय लेख फारच कमी आहेत. 'अनंतपारं किल शब्दशास्त्रम्' व श्री. ना. गो. चापेकर यांचा लेख उत्कृष्ट आहे. कथांचा दर्जा सामान्य आहे.

(१०) **चित्रमयजगत्**-सर्वच लेख व कथा सरस आहेत. श्री. रा. प्र. कानिटकर यांचा 'नवी राज्यरचना आणि मुंबई' हा संकलनात्मक लेख व श्री. श्री. म. माटे यांची 'दुर्गादेवी' ही कथा, श्री. ना. गो. चापेकर यांचा 'संस्कृति' हा लेख हे विशेष उल्लेखनीय आहेत.

(११) **प्रसाद**-याहि अंकांत ललित साहित्यालाच प्राधान्य दिलेलें दिसतें. 'अभिज्ञान शाकुंतल' हा समीक्षणात्मक लेख मराठी वाचकांना त्या नाटकाचा परिचय करून देणारा आहे. कथांचीहि अभिरुचि उच्च आहे.

(१२) **सन्मति**-जैन पंथाविषयी बरीच माहिती यांत आलेली आहे.

(१३) **तरुण भारत**-विशाल मुंबई राज्याची व त्याकरतां कसे कसे प्रयत्न करण्यांत आले याबद्दलची विस्तृत माहिती दिलेली आहे. त्या प्रयत्नांची फलश्रुति म्हणजेच आजचें विशाल मुंबई राज्य होय. मुंबई राज्याचा भौगोलिक, आर्थिक व उत्पादन वगैरे विषयींचा आकडेवारीने व नकाशांच्या सहाय्याने संकलनात्मक परिचय करून दिला आहे. हा अंक नेहमीकरताच संग्रहणीय आहे.

(१४) **बालसन्मित्र**-बालवाचकांस उपयुक्त व मनोरंजक असें मासिक आहे.

(१५) **दूधसागर**-संशोधनात्मक लेख, लघुकथा, एकांकिका, कविता, प्रवासवर्णन असें विविध साहित्य प्रस्तुत अंकांत आहे. दर्जा चांगला आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

(प्रा.) श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

केंद्रवृत्त, नागपूर

कार्यकारी मंडळाची ६ वी सभा

विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा विदर्भ साहित्य मंदिरांत दि. २८-१०-५६ रविवार रोजीं सायंकाळीं ५-१० वा. डॉ. शं. दा. पेंडसे यांचे अध्यक्षतेखाली भरली. ६ चे सुमारास अध्यक्ष श्री. ढवळे स्थानापन्न झाले. प्रथम कर्मचाऱ्यांसंबंधी विचार करण्यांत आला. सरचिटणिसांनी ह्या कार्याकरितां नेमलेल्या समितीचा अहवाल व त्यांनी केलेले नियम वाचून दाखविले. त्यात किरकोळ दुरुस्त्या करून नियम एकमताने स्वीकारण्यांत आले.

दि. १५-१०-५६ पर्यंत आलेल्या आवेदनपत्रांना संमति देण्यांत आली. यानंतर शाखांना अंशदान व अनुदान देण्यासंबंधी विचार करण्यांत आला. अमरावती शाखेला अंशदान देण्यांत यावें व अंशदानाइतकेंच अनुदान मागणीप्रमाणे केवळ प्रचारकार्याकरितां द्यावें असें ठरलें. अन्य शाखांना त्यांची मागणी आल्यावर घटनेप्रमाणे अंशदान द्यावें असें ठरलें. नंतर पुसदला शाखा स्थापन करण्यासंबंधीचें श्री. केसकर यांचें पत्र व पुसदकरांचा ठराव सरचिटणीसांनी वाचून दाखविला. शाखेला संमति देण्यांत आली व पुसदकरांच्या अभिनंदनाचा ठराव करण्यांत आला. शाखा स्थापनेच्या प्रयत्नाबद्दल श्री. माळोदे यांचेंहि अभिनंदन करण्यांत आलें. नंतर विदर्भ साहित्य संघाच्या १९ व्या अधिवेशनासंबंधी सरचिटणिसांनी माहिती दिली. ह्यावेळीं भवभूतीसंबंधी परिसंवाद ठेवण्यांत यावा असें ठरलें. कै. कोल्हटकरांचा फोटो गडकरी स्मारक भवनांत लावण्यास सम्मति देण्यांत आली. कै. गडकरी यांच्या फोटोच्या योजनेला श्रीमती अभ्यंकर यांनी ५०० रु. ची देणगी दिली ह्याबद्दल गडकरी स्मारक समितीने केलेल्या योजनेला संमति देण्यांत आली. नवीन मध्यप्रदेशांत जाणाऱ्या संघप्रेमियांना निरोप देण्याचा समारंभ करावा असेंहि ठरलें. साहित्य अकादमी व कॉन्फ्रंस ऑफ एशियन रायटर्स या दोन संस्थांचीं पत्रें वाचून दाखविण्यांत आलीं. व १० रु. भरून कॉन्फ्रंस ऑफ एशियन रायटर्सचे सभासद होण्याचें संमत झालें.

* *

कै. नेने स्मृतिदिन

विदर्भ साहित्य संघातर्फे गुरुवार दि. २१-११-५६ रोजीं कै. हरिभाऊ नेने स्मृतिदिनानिमित्त प्रि. वा. वा. मिराशी यांच्या हस्तें कै. हरिभाऊंच्या प्रतिमेला हार अर्पण करण्यांत आला.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नंतर अध्यक्ष श्री. म. म. वा. वि. मिराशी व वि. सा. संघाचे उपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचीं भाषणें झालीं. सरचिटणिसांनी समारोपादाखल भाषण केलें व सभेने १ मिनिट स्तब्ध उभें राहून आदरांजलि वाहिली. नंतर हा कार्यक्रम संपला.

* *

पुस्तकालय समिति

विदर्भ साहित्य संघाच्या पुस्तकालय समितीची बैठक गडकरी स्मारकगृहांत दि. २७–१०–५६ रोजीं सायंकाळीं ६–३० वा. होऊन श्री. ग. नि. भवाळकर यांना ग्रंथालयासंबंधीचे नियम करून देण्यास विनंती करण्यांत आली.

वि. सा. संघाच्या वाचनालयाची रूपरेषा साधारणतः पुढीलप्रमाणे राहील.

१ हें वाचनालय संदर्भसाहाय्य व संशोधनासाठीच राहील.

२ वाचनालयाबाहेर पुस्तकें नेतां येणार नाहीत.

३ दुर्मिळ पुस्तकांचा संग्रह करून तीं वेगळीं ठेवण्यांत येतील. परगावांहून येणाऱ्यांसाठी देण्यांत येणाऱ्या सवलतीचा विचार चालू आहे.

* *

सांस्कृतिक कार्यक्रम समिति

विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक कार्यक्रम समितीतर्फे आयोजित केलेल्या "महाराष्ट्र दर्शन" मालेंतील दुसरें व्याख्यान मंगळवार दि. २३ ऑक्टोबर १९५६ रोजीं सायंकाळीं ६–३० वा. विदर्भ साहित्य मंदिरांत नागपुरांतील विद्वान प्राध्यापक श्री. म. अ. चान्सरकर यांचें 'महाराष्ट्राची अर्थरचना' या विषयावर झालें. याच व्याख्यानमालेंतील तिसरें व्याख्यान शुक्रवार दि. २६ ऑक्टोबर रोजीं सायंकाळीं ६–१५ वा. विदर्भ साहित्य मंदिरांत पुण्याच्या सौ. शांताबाई गोखले यांचें 'महाराष्ट्राला संतांचें वरदान' या विषयावर झालें. चौथें व्याख्यान मंगळवार दि. ६ नोव्हेंबर १९५६ रोजीं सायंकाळीं ६–१५ वा. विदर्भ साहित्य मंदिरांत महाराष्ट्राचे ख्यातनाम साहित्यिक प्रा. वा. कृ. चोरघडे यांचें 'महाराष्ट्रांतील लोकसाहित्य' यावर झालें.

सांस्कृतिक कार्यक्रम समितीने आयोजित केलेलीं सौ. मालतीबाई बेडेकर यांचीं व्याख्यानें दि. १०–११–५६ शनिवार रोजीं व ११–११–५६ रविवार रोजीं सायंकाळीं ६–१५ वा. हिंदी साहित्य संमेलनाच्या प्रांगणांत झालीं. विषय अनुक्रमें दोन्ही दिवसांकरितां 'कादंबरीची निर्मिती' व 'आपलें मराठी बालवाङ्मय' असे होते.

प्रा. फडके यांच्या व्याख्यानांच्या अनुषंगाने, योजना करण्यास सांस्कृतिक कार्यक्रम समितीची दि. १९-११-५६ रोजीं सायंकाळीं ६-३० वा. विदर्भ साहित्य मंदिरांत सभा भरली

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होती. दि १-२-३ डिसेंबरला प्रा. ना. सि. फडके यांचीं व्याख्यानें व्हावयाचीं आहेत. त्यासंबंधी योजना करण्यांत आली. व्याख्यानांकरिता पुढीलप्रमाणे तिकिटें ठेवावीं असें ठरलें.

सीझन तिकिटें १ रु. ची व ८ आण्यांची (तिन्ही दिवसांकरितां)
स्वतंत्र तिकिटें ४ आण्यांची (एका दिवसाकरितां)
(सीझन तिकिटें कार्यालयीन वेळांत आगाऊ प्राप्य.)

शाखा वृत्त :

पुसद

पुसद येथे नवीन शाखा स्थापन करण्यास केंद्रीय कार्यकारी मंडळाने संमति दिल्यामुळे दि. १४--१०-५६ रोजीं सभासदांची सभा होऊन त्यांत पुढीलप्रमाणे कार्यकारी मंडळ निवडण्यांत आलें.

अध्यक्ष–श्री. ज. व्यं. पल्लेवार, एम्. ए. एल्एल्. बी., काव्यतीर्थ.

सभासद– १ श्री. श्री. ना. द्रविड, बी. एससी., एल्एल्. बी. २ श्री. दा. पवार, बी. ए. ३ श्री. त्र्यं. स. शुक्ल, एम्. ए., एल्एल्. बी. ४ श्री दि. ना. जकाते, बी. ए., एल्एल्. बी. ५ श्री. भा. श्री. केसकर, बी. ए., एल्एल्. बी. (यांची नियुक्ति नियमांप्रमाणे स्थानिक अध्यक्षांनी केली.)

ह्यानंतर रविवार दि. १८-११-५६ सकाळीं ९ वा. कोषटवार विद्यालयांतील सभागृहांत शाखेच्या उद्घाटनाचा जाहीर समारंभ करण्यांत आला. समारंभाकरिता पुसदचे २०० च्या वर सुविद्य नागरिक उपस्थित होते. श्री. भा. श्री. केसकर व शाखाध्यक्ष श्री. ज. व्यं. पल्लेवार यांनी प्रास्ताविक भाषणें केल्यानंतर सरचिटणीस प्रा. श्री. गो काशीकर यांनी उद्घाटनाचें भाषण केलें. आपल्या भाषणांत त्यांनी समाजशास्त्रीय दृष्टीने साहित्याचें परीक्षण केलें. नंतर शाखाध्यक्षांचें समारोपात्मक भाषण होऊन हा कार्यक्रम अत्यंत उत्साहांत साजरा झाला. नंतर श्री. सरनाईक, श्री. कुटुंबे वकील, श्री. प्रभाकरराव देशमुख वकील, श्री. जकाते वकील, श्री. आबासाहेब पल्लेवार, श्री. भयाजी बयस यांचे ठिकाणीं चहापानाचे कार्यक्रम झाले. ह्या वेळीं सरचिटणिसांनी वि. सा. संघाच्या कार्याचा परिचय करून दिला.

पुसद येथे शाखा स्थापन करण्यांत श्री. दि. बा. जकाते, श्री. आबासाहेब पल्लेवार, श्री. भा. श्री. केसकर, इत्यादि कार्यकर्त्यांनी बरेच परिश्रम घेतले त्याबद्दल सर्वांचें सरचिटणिसांनी आभार मानले.

* *

खामगांव

शाखेचें १९५६-५७ सालाकरिता कार्य करीत असलेलें कार्यकारीमंडळ पुढीलप्रमाणें :

अध्यक्ष—डॉ. पु. गो. एकबोटे. **उपाध्यक्ष**–प्राचार्य के. मा. मुन्शी; **कोषाध्यक्ष** श्री. रा. रा. ओझरकर; **कार्यवाह**–श्री. प्र. वा. ऊर्ध्वरेषे, श्री. मं. वि. नाईक. **सदस्य**–१ श्री. अ. दे. महशूर, २ श्री.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बाबूराव पारसनीस, ३ प्रा. स. अ. डांगे, ४ प्रा. प्र. ग. सहस्त्रबुद्धे, ५ प्रा. पद्माकर डावरे, ६ श्री. प्रा. वि. ए. तारे, ७ श्री. इंदिराबाई खांडेकर, ८. सौ. न. ठोसर.

प्रा. मं. वि. नाईक व प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे दोघेहि जुलै अखेरपर्यंत बाहेर गावीं गेलेले असल्याने प्रा. वि. ए. तारे व पद्माकर डावरे कार्यवाहचें काम पहात आहेत.

* *

गोंदिया

विदर्भ साहित्य संघ आणि मित्रमंडळ यांच्या विद्यमानें यंदा दसऱ्याचा उत्सव श्री. सूरजमल सेठ यांचे बगिच्यांत दि. १४–१०–५६ रोजीं साजरा करण्यांत आला. त्या प्रसंगीं बहुतेक सर्व सभासद हजर होते. प्रसंगाला अनुसरून श्री. दिक्षित मास्तर व श्री. वसंतराव देव यांची भाषणें झालीं. अध्यक्षस्थानीं श्री. कुळकर्णी वकील होते. पानसुपारी व सोनेवितरण होऊन समारंभ पार पडला. त्याचप्रमाणे वरील दोन्ही मंडळांच्या वतीने यंदा कोजागिरीचा उत्सव सरस्वती महिला विद्यालयाचे इमारतींत दि. १८–१०–५६ रोजीं रात्रीं साजरा करण्यांत आला. त्या प्रसंगीं मित्रमंडळाच्या मंडळींनी सुंदर भजन केलें. नंतर दुग्धप्राशन व पानसुपारी होऊन कार्यक्रम संपला.

भंडारा जिल्हाधीश श्री. आवळे यांना विदर्भ साहित्य संघातर्फे निरोप देण्याचा समारंभ दि. २०–१०–५६ रोजीं सायंकाळीं सरस्वती महिला विद्यालयाचे इमारतींत, गोंदिया येथील नगराध्यक्ष श्री. मनोहरभाई पटेल यांचे अध्यक्षतेखाली झाला. श्री. वसंत कुमार मातुरकर यांनी ओवीबद्ध स्वागतगीत म्हणून कार्यक्रमाला सुरवात केली. श्री. तेलंग वकील यांनी संघातर्फे श्री. आवळे यांच्या स्वागतपर भाषण केलें. श्री. आवळे यांना उपाध्यक्ष श्री. कुळकर्णी वकील यांनी हारतुरे अर्पण केले. व शाखेतर्फे भेट म्हणून कलाकुसरीचें काम केलेली एक तसबीर अर्पण केली. नंतर श्री. आवळे यांनी गहिवरून निरोप घेण्याचें भाषण केलें. श्री. आवळे साहेब यांचा शाखेवर फार लोभ होता, त्यामुळे त्यांची तेथून झालेली बदली सर्वांनाच जाणवली. संघाचें शाखेला जागा मिळवून देण्यांत श्री. आवळे यांनी बरेच श्रम घेतले व शाखेला कायमचें ऋणी केलें आहे, हें उल्लेखनीय आहे. श्री. देशमुख वकील यांनी आभार मानल्यावर 'वंदेमातरम्' होऊन हा कार्यक्रम आटोपला.

विदर्भ साहित्य संघ सरचिटणीस, प्रा. श्री. गो. काशीकर यांनी दि. २७–१०–५६ रोजीं गोंदिया शाखेला भेट दिली. शाखा कार्यवाह श्री. बा. का. देशमुख यांनी येथील प्रमुख कार्यकर्त्या मंडळींची भेट व ओळख करून दिली. त्यांनी विदर्भ साहित्य संघाच्या यंदाच्या अधिवेशनाबद्दल स्थानिक कार्यकर्त्यांशीं प्राथमिक चर्चा व विचारविनिमय केला.

विदर्भ साहित्य संघाच्यां संमेलनाबाबत पुनर्विचार करण्यास येथील शाखेच्या हितचिंतकांची व सभासदांची साधारण सभा दि. ६–११–५६ रोजीं श्री. छोटुसाभाई यांचे अध्यक्षतेखाली

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांचेंच घरीं भरली होती. आमगाव हें खेडें एकंदर व्यवस्था करण्याचे दृष्टीने गैरसोईचें होईल, याकरिता अधिवेशन गोंदिया येथेच भरवावें आणि केंद्राकडून त्याबद्दल परवानगी मिळवावी असें ठरलें. अधिवेशन साधारणत: डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यांत भरवावें असें ठरलें. त्याकरितां निरनिराळ्या समित्या स्थापन करण्यांत आल्या आहेत. संमेलनाची तयारी उत्साहाने चालू आहे.

गोंदिया शाखेचे कार्यवाह श्री. बा. का. देशमुख व श्री. ना. ग. डबीर ह्यांनी दि. ११-११-५६ ला दुपारीं १-३० वा. केंद्रीय कार्यालयास भेट दिली. ह्यावेळीं प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक बोलावून अधिवेशनासंबंधी त्यांचेशीं विचार विनिमय करण्यांत आला. आमगावचे ऐवजीं गोंदिया येथे अधिवेशन भरविणें व्यवस्थेच्या दृष्टीने सोईचे होईल, असें सर्वांचें मत पडलें. डिसेंबर ३०-३१ व जानेवारी १ ह्या तारखा अधिवेशनाकरिता सुचविण्यांत आल्या.

* *

नवीन आजीव सभासद

श्री. मनोहरभाई पटेल, गोंदिया.

भाऊजी दफ्तरी संदर्भ ग्रंथालय
30320
दाखल नोंद क्रमांक
दिनांक 10.2.94
99.
विदर्भ ... नागपूर

विदर्भ साहित्य संघाचीं प्रकाशनें

१. निबंध परिमल	(निवडक मौलिक निबंधांचा संग्रह)	रु. २-४-०
२. सुमन संचय	(कविता संग्रह)	रु. १-४-०
३. मराठी गद्य	(मराठी साहित्यांतील निवडक वेचे)	रु. १-८-०
४. अंमलदार	(नाटक) लेखक-श्री पु. ल. देशपांडे	रु. २-०-०
५. भारती	(नाटक) लेखक-श्री नाना जोग	रु. १-८-०
६. हिंदी मराठी भाषा प्रवेशिका	लेखिका-श्रीमती माळतीबाई श्रीखंडे	रु. ०-१२-०

कै. राम गणेश गडकऱ्यांच्या साहित्यावरील अभ्यासपूर्ण प्रबंध

१. वाग्वैजयंतीचें पुनर्मूल्यन	--डॉ. मा. गो. देशमुख	रु. ०-६-०
२. नाटककार गडकरी	--श्री. द. रा. गोमकाळे	रु. ०-६-०
३. गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार	-कविभूषण अण्णासाहेब खापर्डे	रु. ०-८-०
४. गडकऱ्यांच्या नाटकांतील स्वगत	--प्रा. श्री. मा. कुळकर्णी	रु. ०-८-०
५. सतारीचे नव्हे ! एकतारीचे बोल	--श्री. द. वि. तेंडुलकर (प्रफुल्लदत्त)	रु. ०-८-०

सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, केन्द्रीय कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे उद्देश आणि गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराची इमारत पूर्ण करणें व नाट्यगृह बांधणें.

२. वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र युगवाणी आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने दुर्मिळ ऐतिहासिक, शैक्षणिक व वाङ्मयीन ग्रंथांचें प्रकाशन

५. मराठी भाषेच्या हिताचें प्रातिनिधिक स्वरूपाचें कार्य करणें.

मराठी–प्रेमी जनतेने तनमनधनाने विदर्भ साहित्य संघाला मदत करावी अशी नम्र विनंती आहे.

'युगवाणी' सदस्यांना विनामूल्य. ✱ सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नाट्योत्सव १९५६

विदर्भ साहित्य संघाच्या नाट्यसमितीतर्फे दिनांक ६ ते १३ डिसेंबर पर्यंत नाट्योत्सव साजरा होत असून त्या निमित्त पुढील नाटकें करण्यांत येतील.

गुरुवार ता. ६ डिसेंबर १९५६ रात्रीं ९॥ वाजतां

संगीत मानापमान (सादरकर्ते : यशवंत कलाकेंद्र, नागपूर)

शनिवार ता. ८ डिसेंबर १९५६ रात्रीं ९ वाजतां

संगीत होनाजी बाळा [सादरकर्ते : मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई]

रविवार ता. ९ डिसेंबर १९५६ रात्रीं ८ वाजतां

आंधळ्यांची शाळा [सादरकर्ते : नागपूर नाट्यमंडळ, नागपूर]

मंगळवार ता. ११ डिसेंबर १९५६ रात्रीं ९ वाजतां

राणीचा बाग [सादरकर्ते : अभिनव नाट्यमंदिर नटसंच, नागपूर]

बुधवार ता. १२ डिसेंबर १९५६ रात्रीं ८ वाजतां

संगीत उद्यांचा संसार [सादरकर्ते : सारस्वत मंडळ, नागपूर]

गुरुवार ता. १३ डिसेंबर १९५६ रात्रीं ९ वाजतां

विश्वविद्यालयीन यशस्वी नाट्यप्रयोग

[खोलकुटे ढाल मिळविणारा यशस्वी महाविद्यालयीन नाट्यप्रयोग]

उद्घाटक—नटवर्य केशवराव दाते

गुरुवार ता. ६ डिसेंबर १९५६ सायंकाळीं ५॥ वाजतां

समारोप—माननीय यशवंतराव चव्हाण, मुख्यमंत्री, मुंबई राज्य

गुरुवार ता. १३ डिसेंबर १९५६ सायंकाळीं ५॥ वाजतां

स्थळ—नागपूर विश्वविद्यालयाचा रंगमंच.

सर्व नाटकांचें सीझन तिकिट १००, ५०, २५, १० व ५ रु.

तिकिटें विदर्भ साहित्य संघांत मिळतील. नाट्योत्सवाचें उत्पन्न संकल्पित रंगमंदिर बांधण्याच्या मदतीसाठी देण्यांत येईल.

हें मासिक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी वि. सा. संघाकरितां
नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १ येथे मुद्रित करून
संघ–कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ